# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

# संवाद

Price Rs. 3/-
Vol. - 1
Issue - 4
October 2008
ऑक्टोबर २००८

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।

## दिवाळी विशेषांक



Visit us at : www.sbipensionerspune.org
E-mail : sbipenmumbai@yahoo.com

# H *संपादकीय*

सभासद बंधु भगिनीनो,

'संवाद' दीपावली विशेषांक २००८ सभासदांना सादर करताना विशेष आनंद वाटतो.

भारतीय संस्कृतीत 'दीपावली' हा सण सर्व थरातील लोक मोठ्या आनंदाने, उत्साहाने साजरा करतात. विशेषत: कोकणवासी मंडळींना 'गणपती' आणि 'दीपावली' हे दोन्ही सण म्हणजे पर्वणीच असते. कामधंद्यासाठी मुंबईत किंवा अन्य शहरात गेलेले लोक हमखास सुट्टी घेऊन कोकणात आपापल्या घरी येतात. गगनाला भिडलेली महागाई, तसेच इतर सर्व अडचणींना तोंड देऊन, प्रसंगी ऋण काढून हे लोक सुद्धा सर्व विसरून मोठ्या आनंदाने व भक्तिभावाने हे सण साजरे करतात.

हे सर्व करताना, बिहारमधील भीषण पूरामुळे कित्येक लोकांची घरेदारे गेली, हजारो लोक मृत्युमुखी पडले. कित्येकांचे त्यामुळे संसार उध्वस्त झाले, काश्मीरमध्ये दहशतवाद्यांकडून आपले काही जवान शहीद झाले, गेल्या महिन्यात ऐन गणेशोत्सवात दिल्ली येथे झालेल्या बॉम्बस्फोटात काही निरपराध नागरिक नाहक बळी पडले. या गोष्टींची आपल्या प्रत्येकाच्या मनात एक खोलवर सल, रुखरुख, खंत आहे. त्या सहजासहजी विसरणं शक्य नाही.

तरी पण माणूस हा शेवटी माणूस आहे. त्यामुळे आनंदात राहण्यासाठी, सुखात असण्यासाठी आत्ताच्या वेळेपेक्षा दुसरी योग्य वेळ कोणतीही नाही, असाच विचार तो करतो. आयुष्यात आव्हाने तर असतातच. ती झेलता झेलताच आनंदी रहाण्याचा निश्चय तो करत असतो. हे सर्व केल्यावर शेवटी आपणाला कळतं की आनंदाकडे जाणारा कोणताही मार्ग नाही. आनंद हाच एक महामार्ग आहे. म्हणून प्रत्येक सण आपण मोठ्या आनंदाने साजरा करतो. परंतु आयुष्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट असते ती स्वत:बरोबर इतरांना आनंद देण्यासाठी प्रयत्न करणे, योग्य वेळी मदतीचा हात पुढे करणे. गंजण्यापेक्षा बाहेर झिजणे बरे नव्हे का ?

म्हणूनच दु:खीतांना-पिडीतांना मदतीचा हात देऊन त्यांच्या जीवनात निदान पणतीचा प्रकाश तेवत ठेवून त्यांचे संसार उजळून टाकण्यास आपण हातभार लावू या आणि कर्तव्यपूर्तीचे समाधान काही प्रमाणात का होईना मिळवू या. दुसरी मेणबत्ती लावण्यासाठी वापरल्याने पहिल्या मेणबत्तीचं काहीच कमी होत नाही. नाही कां ?

आपल्या फेडरेशनने केलेल्या आवाहनानुसार दिनांक २३ सप्टेंबर २००८ रोजी मुंबईत 'धरणे कार्यक्रम' यशस्वीरीत्या पार पडला. कोर्टाच्या मनाईमुळे हा कार्यक्रम बँकेच्या आवारात न होता आझाद मैदानावर करण्यात आला. यात भाग घेण्यासाठी इतर सर्कल्समधील पदाधिकारी व मुंबई सर्कलमधील सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात मुंबईतील स्त्री सभासदांचा सहभाग लक्षणीय होता. अशाच प्रकारचा कार्यक्रम दिल्ली येथे दि. ६ ऑक्टोबर २००८ रोजी 'जंतरमंतर' येथे यशस्वीरीत्या आयोजित केला होता.

दरवर्षी प्रमाणे 'संवाद' चा दीपावली विशेषांक वैविध्यपूर्ण लेख, कथा, कविता, विनोद यांनी परिपूर्ण व आकर्षक करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. सर्व सभासद त्याचे आनंदाने स्वागत करतील अशी खात्री आहे. या अंकासंबंधीच्या प्रतिक्रिया सभासदांनी जरूर जरूर पाठवाव्यात. ही दीपावली सर्व सभासदांना आनंदाची, समाधानाची जावो अशा मन:पूर्वक शुभेच्छा ! - **वसंत धुपकर**

## Congratulations

Dr. Sanjay, son of Shri Moreshwar Gangadhar Wagh who is our senior pensioner member from Nagpur, has recently earned international laurels. University of Pune awarded the doctorate to Dr. Sanjay in 1987. He did his research in Astrophysics and Relativity also at some of the prestigious institutions like the T.I.F.R.Mumbai; Havard University, Cambridge, USA; the Inter-University Centre for Astronomy & Astrophysics established by the well-known astrophysicist Dr. Jayant V. Narlikar etc.

In 2002, he pointed out a basic flaw with Einstein's formulation of the general relativity. He then developed a new theory for the unification of fundamental physical interactions. This Universal Theory of Relativity has recently earned him international honours. Dr. Sanjay Wagh is currently the Director of the Central India Research Institute at Nagpur.

We congratulate him for his outstanding research work and wish him a bright future !!

## Bihar Relief Fund

As appealed by our Federation we have remitted Rs.51,000/-, out of our 'Distress Relief Fund', as our Circle Association's contribution to the "Bihar Relief Fund" which is being raised by our Federation. The demand draft for the amount has been sent to our SBI Pen. Assn, Patna Circle who will send it to the "Chief Minister's Relief Fund" thereat, along with contributions received from other Circle affiliates.

**- Secretary**

## स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल),पुणे

प्रिय सभासद बंधु/भगिनींनो,

तुमच्याजवळ चार शब्द बोलावे असे वाटत होते. पण आता मुहूर्त मिळाला. माझ्या व श्री. बाळासाहेब दांडेकरांच्या, तसेच तुमच्या कमिटी सभासदांच्या आवाहनाचा मान राखून तुम्ही जवळजवळ ६०० च्या वर संख्येने मुंबई येथील बँकेच्या कॉर्पोरेट सेंटर येथे २३-९-२००८ रोजी हजर झालात व जरी कोर्ट ऑर्डरमुळे आपल्याला पूर्वी ठरविलेली जागा बदलून आझाद मैदान येथे जाऊन धरणे कार्यक्रम करावा लागला तरी अतिशय शिस्तशीरपणे व कुठलीहि कुरबुर न करता कार्यक्रमात जोमाने भाग घेतलात याबद्दल तुमचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच. विशेषत: महिलांची उपस्थिती लक्षणीय म्हणजे जवळपास ६०/७० होती.

अशा प्रकारचे आंदोलन पेन्शनर्स लोक प्रथमच करीत असल्यामुळे बऱ्याच लोकांच्या मनात ते कितपत यशस्वी होईल याबद्दल रास्त शंका होती ती तुमच्या मोठ्या प्रमाणांत घेतलेल्या सहभागाने खोटी ठरली. तुम्हाला माहीत आहे कि या कार्यक्रमाला आपल्या फेडरेशनचे अन्य सर्कल्समधील नेते हजर होते व त्यांना मुंबई सर्कल असोसिएशन काय करू शकतं, याची चुणुक दिसली व त्या सर्वांनी आपले तोंड भरून कौतुक केले आहे. तसेच बँकेच्या व सरकारच्या अधिकाऱ्यांनासुध्दा आपली संघटना म्हणजे नुसती कागदी संघटना नाही हे दिसून आले. आपल्या संघटनेचे मुंबई, ठाणे, कल्याण परिसरांत अंदाजे ४००० सभासद आहेत. त्या मानाने ६०० चा जमाव म्हणजे फार नाही. पुढे यदाकदाचित असा कार्यक्रम करावा लागला तर 'खाने को हम, लढनेको हमारा बडा भाई' ही म्हण विसरून स्वत: भाग घ्यावा.

मी तुम्हाला पुन: एकदा विनंती करतो की, जर का आपल्याला भविष्यात असे आंदोलन करावे लागले तर तुम्ही याच्या दुप्पट संख्येने त्यात सहभागी व्हाल व आपल्या संघटनेचे व श्री. बाळासाहेब दांडेकर, जे आपले फेडरेशनचे अध्यक्ष आहेत, त्यांचे हात बळकट कराल हीच अपेक्षा.

या कार्यक्रमाला नागपूरचे नवीनच निवडून आलेले नेते व सांगली मिरजचे काही बोलघेवडे नेते हे प्रकर्षाने गैरहजर होते असे वाटते. पुढे वेळ पडल्यास ते सुध्दा कार्यक्रमात सहभागी होतील अशी आशा करतो.

आपणांस व आपल्या सर्व कुटुंबियांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !!

**वि. मो. गोखले**
अध्यक्ष

---

## युनीट वार्ता

**सोलापूर युनीट :**

**Pollution, Pollution - Cycle is the Solution**

आपल्या सोलापूर युनीटने, सोलापूर येथील बाळीवेस शाखेच्या शताब्दी वर्षानिमित्त बाळीवेस शाखा, स्थानिक रोटरी क्लब व आपल्या युनीटच्या संयुक्त विद्यमाने २२ ऑगस्ट ०८ रोजी आयोजित केलेल्या सायकल रॅलीत भाग घेऊन, स्टेट बँक पेन्शनर्सनासुद्धा सामाजिक प्रश्नांची जाण असून ते सोडविण्यात त्यांचा सहभाग नेहमीच असतो हे दाखवून दिले. ९० देशांचा जवळजवळ ५ लाख किलोमीटर सायकलवरून प्रवास करून आलेले श्री.प्रशांत गोळवलकर यांनी पण या ६ किलोमीटर सायकल रॅलीत भाग घेतला होता. सोलापूर पोलीस कमिशनर श्री.भूषणकुमार उपाध्याय यांच्या हस्ते शुभारंभ झालेल्या या रॅलीत अनेक तरूण, तरूणीं बरोबरच स्टेट बँकेतील निवृत्त कर्मचाऱ्यांनीही वय विसरून उत्साहाने भाग घेतला. या रॅली निमित्त आयोजित केलेल्या संध्याकाळच्या कार्यक्रमास आपल्या रीजन-४ चे सहा.महाप्रबंधक श्री.यशवंत पटवर्धन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सोलापूर महापालिकेचे आयुक्त श्री.रणजितसिंग देओल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात श्री.गोळवलकर यांनी आपल्या जागतिक सायकल प्रवासातील आलेल्या अविस्मरणीय अनुभवांचे कथन केले. सोलापूर येथील आपले ज्येष्ठ सभासद श्री.अरविंद किणीकर यांनीही आपल्या इतर सभासदांबरोबर या सायकल रॅलीत ६ किलोमीटर सायकल चालवून प्रत्यक्ष सहभाग घेतला याबद्दल सर्वांनी कौतुक केले. बाळीवेस शाखेचे श्री.प्रदीप जोशी व सर्व कर्मचाऱ्यांनी ही रॅली यशस्वी होण्यासाठी खूप प्रयत्न केले. आपल्याही सभासदांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता.

- **तम्मा पाटील**, सेक्रेटरी

**सातारा युनीट :**

आपले सातारा युनीट हे नेहमीच सामाजिक बांधिलकीचे भावनेतून कांही ना कांही उपक्रम राबवित असते. या वर्षी सातारा युनीटने २००८ सालच्या माध्यमिक शालांत १० वी च्या परिक्षेत संपूर्ण महाराष्ट्रात सर्वप्रथम आलेल्या चि.गौरव गिरीश कुलकर्णी याचा सत्कार मासिक मिटींगमधे न्यू इंग्लिश स्कूलचे माजी मुख्याध्यापक श्री.कंग्राळकर सर यांचे हस्ते करण्यात आला. चि. गौरव हा सातारा शाखेतील स्पेशल ऑफिसर श्री.गिरीश कुलकर्णी यांचा चिरंजीव होय. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.जी.डी.देशपांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.गुलाब शेख यांनी केले.

- **सु.श्री.देशपांडे,** अध्यक्ष

# FEDERATION OF STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATIONS

Registered under the Societies Registration Act 1860 at Delhi Rgn.No. S/17025 of 1986

All letters to be addressed to
The General Secretary

President

Shri. B. G. Dandekar
1, Chaitraban, S. V. Rd.,
Opp. Malhar Cinema,
Thane (West) 400 602.
Tel.: (022) 25421794

General Secretary

Shri. S. B. Gokhale
19, Jayshri,
R. N. Narkar Marg,
Ghatkopar (East)
Mumbai - 400 077.
Tel.: (022) 25134493

Secretary

Shri. G. K. Gandhi
62, Shrinagar Extension,
Khajrana Road,
Indore - 452 001 (M.P.)
Tel.: (0731) 2562157

Treasurer

Shri. B. P. Khare
16, Shree Shivanand
Co.op. Hsg. Soc. Ltd.
Gavand Path, Naupada,
Thane (West) 400 602.
Tel.: (022) 25421719


Ref. No. P 56 of 2008-09 Date : 3rd October, 2008

Shri K.V. Eapen, I.A.S.
Joint Secretary (Industrial Relations)
Department of Banking Services
Govt. of India, Ministry of Finance
New Delhi

Dear Sir,

**Pensioners/Family Pensioners of State Bank of India**

We are grateful to you for giving us an appointment at short notice to meet you on the 30th September 2008 at 3.00 p.m. to put before you the problems of Pensioners/Family Pensioners of SBI and for giving us patient hearing for over an hour. We are particularly thankful to you because this is the 2nd time in 7 months when we have been given an opportunity to present our case to your department.

2. In this connection we forward herewith a copy of our advocate's letter dated the 19th April 2005 to the Indian Banks' Association, Mumbai and their reply dated the 23rd April 2005, the contents of which are self explicit. (advocate's letter and their reply not enclosed)
3. We therefore look forward to your sorting out the various problems faced by our members as brought out in our discussions and in our letters to you and doing justice to our various demands.
4. We wish to draw your particular attention to the cases of our members who were affected by the illogical decisions taken by the Bank/Govt. in the following matters.
   (a) Decision to put a ceiling of Rs.2400 p.m. including FDR in respect of pre 1-11 -1987 retirees.
   (b) While we reserve our right of demanding 50% pension, on last drawn pay (subject to 30 years pensionable service) at least the Bank/Govt should follow their own decision to introduce 50/40% formula from 1-11-1987 and not from irrational date of 1-3-1999 which at least partially will benefit the very old pensioners whose one leg is already in the grave yard.
   (c) Same is the case of about 33,000 pensioners who retired between 1997 and 2002 and are paid pension not on their basic pay at the time of retirement but are paid pension on the prerevised salary. The Bank had not been able to give them proper pension for last over 6 to 10 years. We request you to arrange for payment of pension at 50/40% on their last drawn pay which will to some extent ameliorate their difficulties.
5. We once again thank you for taking keen interest in understanding our problems and are sanguine that you will redress the above mentioned grievances of our members.

Thanking you,

Yours faithfully,
Sd/-
(B.G.Dandekar)
President


Vice Presidents

| | | |
|---|---|---|
| Shri. B.K. Ghose | Ph : | 033-24408089 033-24407116 |
| Shri. V.K. Mehrotra | Ph : | 0522-2208030 0522-2507104 |
| Shri. N.K. Jain | Ph : | 0755-2465997 |
| Shri. R.N. Godbole | Ph : | 080-23489157 |

## Why SBI Pensioners could not go on fast on $2^{nd}$ October 2008?

*- P.G.Kakodkar, Former Chairman, State Bank of India*

We had prepared for almost one month towards making our fast on $2^{nd}$ October 2008 very effective. I had received letters from over 300 Pensioners planning to join the relay fast and requesting to inform them the date on which they should come to Mumbai to participate in the fast and many more were waiting for our call to intimate them to participate in the fast, if the same is prolonged.

2. But on Saturday, the $20^{th}$ September 2008, late in the evening, I received a notice from the Advocate of SBI to be present at the High Court as they have moved to the High Court requesting for a stay on the following :

a) The fast which I planned to commence at 10 a.m. on $2^{nd}$ October 2008.

b) The "Dharna" planned by SBI Pensioners Federation on $23^{rd}$ Sept.'08.

c) The total Strike called for by the Working Employees and the Officers on $25^{th}$ & $26^{th}$ Sept.'08.

3) I had no time to seek the services of a counsel to appear before the High Court at 12 noon on $22^{nd}$ Sept.'08. I took the advice of my solicitor friend and decided to plead the Pensioners' case personally at the High Court. We were summoned at 12 noon and the Bank's counsel made a plea that there are three protests - Dharna, Strike and Fast - during the next ten days which will disturb the working of the Bank and that all should be precluded from doing it in front of the Bank. The High Court Justice suggested that they can come to an understanding and we were called in the Court at 3.30 p.m. He was apparently sympathetic to the Pensioners as he mentioned that he doesn't expect pensioners to disturb the Bank's operations. But, later at 3.30 p.m., the Bank's counsel made a plea that apart from Pensioners, there are working staff and officers, who propose to go on strike on $25^{th}$ & $26^{th}$ Sept. 2008 and from their past experience it is seen that the Bank is unable to carry out on normal working smoothly. Therefore, while they can continue to do their Dharna, Strike or Fast, they should not do it within the compound of the Bank but do it outside. This argument was accepted by the Court despite my plea for permission of the Court to go ahead with the fast that will be conducted as the Pensioners are absolutely harmless and the fast will be conducted silently and without any disturbance to the Bank. **I further pleaded that we are only interested in arousing the conscience of the people and the Government, whom we consider responsible for not giving us 50% pension as laid down in our SBI Pension Fund Rules.** Despite our arguments, the Court decided that while we can protest, but it will not be permitted within the compound of SBI Bhavan. The alternative was to do the same on the footpath but the Police had objections as Sachivalaya and Vidhan Sabha are in the vicinity and they told us that it can be only done in the Azad Maidan in the open.

As my intention was to have the fast on Mahatma Gandhi's birthday in front of SBI Bhavan so that we can arouse the conscience of those who have denied us appropriate pension. I could not tell my other colleagues, who are aged pensioners to expose themselves to the open Azad Maidan, where at any given time you find a number of organizations also on protest actions. **In the circumstances, I decided to defer the fast for the time being and future plans will be advised to all my pensioner colleagues in due course.**

4) In the meantime, I give herewith (printed on the next page) a copy of the letter received from Smt. Bharati Rao, Dy.Managing Director & Corporate Development Officer, the contents of which are self explanatory. I have also sent a letter to Mr.Arun Ramanathan, Secretary (Financial Services), Govt. of India, apprising him in detail the injustice meted out to the pensioners who retired in the past and getting a raw deal by denying their just and logical demand of 50% pension as laid down in our SBI Pension Fund Rules, on the lines of my earlier communication published in August/September 2008 issues of 'SAMVAD'. Similar letters have also been sent by me to Dr.Manmohan Singh, Prime Minister of India, Mr. P. Chidambaram, Finance Minister, Dr. D. Subbarao, the then Finance Secretary & Smt.Sonia Gandhi, Chairperson of UPA.

**LONG LIVE UNITY OF SBI PENSIONERS !!**

Bharati Rao
Dy. Managing Director &
Corporate Development Officer

State Bank of India
Corporate Centre,
Madame Cama Road,
Mumbai - 400 021.

22nd September 2008

D.O.No.CDO/IR/SPL/326

Dear Shri.Kakodkar,

**PROPOSED INDEFINITE RELAY FAST BY SBI PENSIONERS**

With reference to above, you may be fully aware that all the pension related issues have already been taken up with the Government and we have submitted a detailed proposal alongwith our recommendations. The matter is also being followed up closely at the highest level and we had an exclusive meeting on the issue on 9th of this month at New Delhi with the Govt. officials.

2. You will therefore appreciate that at a time when the matter is being pursued vigorously and is at an advanced stage, resorting to agitational path such as hunger strike/dharna etc. may be counter productive and may affect the decision making process adversely.

3. Further, as per the provisions of the Banking Regulations Act and various Supreme Court judgements, pensioners not being the employees of the Bank do not get a right under Industrial Dispute Act to go on strike/hunger strike in the premises of the Bank.

4. I, therefore, urge upon you to please do not take a step which may nullify our efforts at this point of time.

I hope you will reconsider your decision.

Yours sincerely,
Sd/-
(Smt. Bharati Rao)

Shri.P.G.Kakodkar,
Flat No.1001, Brooke Ville,
Opposite Bafna Housing Society,
Moghul Lane, Mahim,
Mumbai - 400016.

---

## H अभिनंदनीय

आपले कोल्हापूर येथील झोनल कमिटी सभासद श्री. अरविंद नलवडे यांचे जावई प्रा.संजय माधवराव चव्हाण यांनी नुकतीच आय्.आय्.टी. मुंबईच्या केमिकल इंजिनिअरींग मधील सर्वोच्च पदवी मिळविली. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे शुभ हस्ते पदविदान समारंभ पार पडला.

प्रा. श्री.चव्हाण यांचे हार्दिक अभिनदंन !

**- सेक्रेटरी**

M M M M M

## H अभिनंदनीय

आपले अकोला येथील सभासद एस.जे.देशपांडे हे महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ व्होकेशनल एक्झामिनेशन ''योग ॲण्ड नॅचरोपथी'' विषयांची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

त्यांचे असोसिएशनतर्फे अभिनंदन !

**- सेक्रेटरी**

M M M M M

## List of Donors who gave Donations during the period from Jan.2008 to August 2008

**(Kindly refer earlier lists published in SAMVAD issues of February & August 2008)**

| NAME | AMOUNT |
|---|---|
| MR.S.S.KASHIKAR | 11000 |
| MR.SORAB BHUSANIA | 10000 |
| MR.M.R.HAGAVANE,WAI | 6100 |
| MRS.MEENA SHEVADE | 6000 |
| MR.SHASHI KARKHANIS | 5551 |
| MR.U.R.DHURI | 5500 |
| A WELLWISHER | 5001 |
| PERIN HANSOTIA | 5001 |
| HATTANGADI | 5001 |
| A WELLWISHER | 5001 |
| MRS.SHOBHANA LELE(DIXIT) | 5000 |
| SMT.SHAILAJA D.PURANDARE | 5000 |
| MR.R.V.BHAVE | 5000 |
| MR.N.S.NERURKAR | 5000 |
| MR.KUMAR V.CHITRE | 5000 |
| MRS.MEERA R.KULKARNI | 5000 |
| SMT.PADMAJA MHADGUT | 5000 |
| MR.SUNIL C.MONE | 5000 |
| MR.ASHA V.NIMONKAR | 4000 |
| MR.L.M.ALMEIDA | 2750 |
| SMT.SUNITI KAPILESHWARI | 2501 |
| MRS.BHAKTI NADKARNI | 2500 |
| MR.SHRIKRISHNA D.KARKARE | 2500 |
| MR.RAJARAM M.PANDIT | 2500 |
| MR.ASHOK J.DESAI | 2500 |
| MR.M.M.OSWAL | 2500 |
| MR.AMBADAS KULKARNI | 2500 |
| SMT.ARCHANA VESVIKAR | 2500 |
| MR.BHIKAJI SAWANT | 2251 |
| MR.M.K.DHODAPKAR | 2000 |
| MR.D.R.BHAGWAT | 2000 |
| MRS.MADHAVI PALSHIKAR | 2000 |
| MRS.PADMAJA GOKHALE,PUNE | 2000 |
| A WELLWISHER | 2000 |
| SMT.KAVITAN TRILOKEKAR | 2000 |
| LATE KASHINATH LOKHANDE | 1600 |
| MR.V.D.KARMARKAR | 1551 |
| MR.T.S.RAJGOPAL | 1501 |
| MR.RAGHUNATH R.PATHARE | 1501 |
| SMT.M.D.BRAHMAKSHATRIYA | 1500 |
| MR.V.K.HERLEKAR | 1500 |
| MR.R.E.LEWIS | 1500 |
| MR.S.K.BHAGWAT | 1200 |
| MR.A.S.TULJAPURKAR | 1111 |
| SMT.MRDULA KILPADY | 1100 |
| MR.P.G.WANKAR | 1002 |
| MR.VASUDEO V.HARDIKAR | 1001 |
| MR.HEMANT D.GOKHALE | 1001 |
| MR.M.D.PALKAR,PUNE | 1001 |
| MR.K.W.ACHARYA | 1001 |
| MR.SHRIKANT TANAVADE | 1001 |
| MR.AJAY SULE | 1001 |
| MRS.REKHA SULE | 1001 |
| MINOO MISTRY | 1001 |
| MR.J.K.MASTAKAR | 1001 |
| MR.NARAYAN ATRE | 1001 |
| MR.N.S.PUDAMJEE | 1001 |
| MR.M.K.NAYAK | 1001 |
| MR.N.G.BHATWADEKAR | 1000 |
| MRS.PADMAVATI PATASKAR | 1000 |
| SMT.SWATI GARDE | 1000 |
| MR.SHARAD HATTANGADI | 1000 |
| MRS.KISHORI A.BIRODKAR | 1000 |
| SMT.SHIKHA IYER | 1000 |
| SMT.PRERANA SHAH | 1000 |
| MR.MUKUND SOMAN | 1000 |
| DELPHINE FERNANDES | 1000 |
| MR.PANDURANG DESHPANDE | 1000 |
| MR.ANANT R.WAD | 1000 |
| MR.V.A.RANDIVE | 1000 |
| MR.R.R.CHITALE | 1000 |
| MR.MADHAV PRABHU | 850 |
| MR.K.D.PARADKAR | 800 |
| MR.S.H.NEWASE | 776 |
| MR.GOVIND BAGUL | 751 |
| MR.M.K.CHAPHEKAR | 750 |
| MR.VASANT PRABHUDESAI | 750 |
| MR.C.D.MAHADEOKAR | 700 |
| MR.G.G.GOKHALE | 680 |
| MR.S.R.NIMBAKAR | 601 |
| MRS.SUNETRA NIMBAKAR | 601 |
| MR.SHASHIKANT GOGATE | 600 |
| MR,S.P.PANDE,KOLHAPUR | 575 |
| MR.J.A.KHADKE | 575 |
| MR.GOPAL G.MULAY | 501 |
| MR.S.N.BHAVE | 501 |
| SMT.SUSHAMA M.VAIDYA | 501 |
| MRS.SARITA S.PRADHAN | 501 |
| MR.BABURAO CHAUDHARY | 501 |
| MR.R.Y.LIMAYE,NASHIK | 501 |
| MRS.HANSA A.VAKIL | 501 |
| MR.S.D.KINIKAR | 501 |
| MR.P.M.MUTHAL | 501 |
| SMT.USHA KHADILKAR | 501 |
| MR.SHANTILAL DALAL | 501 |
| MR.VASANT VELANKAR | 501 |
| MR.N.G.NAVAGHARE | 501 |
| MR.SUBHASH DATAR | 501 |
| MR.J.M.VASANDANI | 501 |
| MRS.ARUNA BOLAR | 501 |
| MR.CHANDRASEN PITALE | 501 |
| MR.S.G.AGASKAR | 501 |
| MR.S.B.DESHMUKH | 501 |
| MRS.NEETA DADDIKAR | 501 |
| MR.SHASHIKANT SALELKAR | 501 |
| MR.S.V.PAI BIR | 501 |
| MR.S.S.BARVE | 500 |
| MRS.KUNDA BORDE | 500 |
| MR.KASHINATH K.NERKAR | 500 |
| MRS.VIMAL R.DATE | 500 |
| MR.C.Y.HIRLEKAR | 500 |
| MR.ASHOK V.GADGIL | 500 |
| SMT.NALINI J.PUROHIT | 500 |

| | |
|---|---|
| MR.MAHENDRA M.VAIDYA | 500 |
| MR.ARVIND M.JOSHI | 500 |
| MR.G.H.GURJAR | 500 |
| MR.S.D.DANDAVATE | 500 |
| MR.S.T.SHINGONIKAR | 500 |
| MR.K.S.KARSANA | 500 |
| MR.ANTHONY PEREIRA | 500 |
| MR.M.S.PRABHU | 500 |
| MR.ASHOK KARKHANIS | 500 |
| MR.Y.G.JAMADAGNI | 500 |
| MR.A.RODRIGUES | 500 |
| MR.ASHOK R.SAWANT | 500 |
| MR.RATAN DHUME | 500 |
| SMT.SUNITA NAIK | 500 |
| MR.VINAYAK S.KULKARNI | 451 |
| SMT.DOLLY SASSANI | 400 |
| MR.MADHUSUDAN BHIDE | 351 |
| MR.VASANT DESHPANDE | 350 |
| MR.ARVIND KAKAIYA | 311 |
| MR.D.A.KULKARNI | 251 |
| MR.P.H.CHANDEKAR | 251 |
| MR.V.S.KULKARNI,KOLHAPUR | 251 |
| MR.A.V.MANTRI | 251 |
| MR.R.B.DESHMUKH | 250 |
| MR.SURESH G.DANDEKAR | 250 |
| MR.V.PELAPKAR | 250 |
| MR.H.T.NAMJOSHI | 201 |
| MR.S.N.TALPADE | 201 |
| SMT.LALITA V.PRABHU | 200 |
| MR.H.D.CHONGAJKAR | 200 |
| MR.A.G.PALKAR,SATARA | 200 |
| MR.YASHWANT OGALE | 200 |
| MR.S.B.DHARMADHIKARI | 200 |
| SMT.SHOBHA DESHPANDE | 200 |
| SMT.SADHANA DHARWADKAR | 200 |
| MR.ANIL GADKARI | 200 |
| MR.SURENDRA KADAM | 200 |
| MR.RAMAKANT NARINGREKAR | 200 |
| SMT.RAJITHA BALCHANDRAN | 200 |
| MR.V.D.KULKARNI | 151 |
| MR.T.R.SATHE | 150 |
| MR.P.M.NARKAR | 150 |
| MR.SUHAS KHANDEPARKAR | 150 |
| MR.N.H.P.DESAI | 150 |
| MR.N.J.RAYKAR | 150 |
| MR.V.G.BHAT | 150 |
| MR.SUBHASH KAMAT | 150 |
| MR.MANUEL ABREO | 150 |
| MR.K.V.GOPINATHAN | 150 |
| MR.PRAKASH MASHELKAR | 150 |
| RUTH GOMES | 150 |
| VAMONA POI | 150 |
| B.SANZGIRI | 150 |
| MR.R.C.VERENKAR | 150 |
| MR.K.P.M.RAJAN | 150 |
| SMT.SHOBHA NAIK | 150 |
| ROSARIO M.L.MONTEIRO | 150 |
| LYDIA GOPINATHAN | 150 |
| MR.PRAKASH RIVONKAR | 150 |
| MR.V.N.KULKARNI (GOA) | 150 |
| MR.L.V.PALEKAR | 150 |
| MR.PRADEEP SHETYE | 150 |
| MR.ARVIND BARTAKKE | 150 |
| PRAKASH K. | 150 |
| MR.V.Y.KARANDIKAR | 150 |
| MR.G.J.PANDIT | 150 |
| PRABHAKAR K. | 150 |
| MR.R.G.PRABHU | 150 |
| MYRA SHETKAR | 150 |
| MR.D.M.SHANBHAG | 150 |
| MR.SHRIPAL VAIGANKAR | 150 |
| MR.M.M.SATHE,BARODA | 101 |
| MR.SUBHASH J.JOSHI | 101 |
| MR.DEVAYANI MEHTA | 101 |
| MR.SHAMRAO R.AMDEKAR | 101 |
| MR.A.D.JOJARE | 101 |
| MRS.SHEELA PRABHUNE | 101 |
| MR.B.KRISHNAMURTHY | 101 |
| MR.R.S.WANI | 100 |
| MR.D.D.KAKADE | 100 |
| MR.A.P.KORANNE | 100 |
| MR.P.G.KULKARNI | 100 |
| MR.S.M.BARDAPURKAR | 100 |
| MR.V.V.KULKARNI | 100 |
| SMT.MEENAXI G.PITAMBARE | 100 |
| MR.A.N.JOSHI,PUNE | 100 |
| MR.HEMANT GOKHALE, GWALIOR | 100 |
| MR.Y.G.KARANDIKAR | 100 |
| MR.M.M.TRIPATHI | 100 |
| MR.VAMAN KALGUTKAR | 100 |
| MR.S.V.KULKARNI,DHARWAD | 100 |
| MR.M.S.KRISHNA MURTHY | 100 |
| MR.GOPINATH Z.SHIMPI | 100 |
| MR.G.P.DAWALKAR | 100 |
| MR.UTTAM KALE | 100 |
| MR.B.S.RANDIVE | 100 |
| MR.VISHNU J.GAWADE | 100 |
| MR.DATTATRAY GAWADE | 100 |
| MRS.VANITA D.GAWADE | 100 |
| MR.LAXMAN PALKAR | 100 |
| MR.BANSILAL BUDKI | 100 |
| SMT.ANURADHA WARANG | 100 |
| MR.I.H.DIAS | 100 |
| MR.ANIL AMBESKAR | 100 |
| MR.NORBERT D'SOUZA | 100 |
| ELSA SANTOS | 100 |
| MR.PRAKASH SINGBAL | 100 |
| MR.M.S.BHAT | 100 |
| ERIC WATSA | 100 |
| MR.C.COUTINHO | 100 |
| LINGRAS B. | 100 |
| MR.V.MORDEKAR | 100 |
| MR.V.S.RANE | 100 |
| MR.SEBASTIAN D'SOUZA | 50 |
| MR.VINAYAK J.RANE | 50 |
| MR.SHIVRAM M.MANJREKAR | 50 |
| MR.S.M.MHAPSEKAR | 20 |

विनोदी कथा

# H बदली

ते गाव तसे ग्रुपग्रामपंचायतचे. कुठल्याच गोष्टीची पंचाईत नव्हती.

गावच्या मधूनच एक हायवे रस्ता गोव्याकडे जाणारा. तोच एकमेव मोठा रस्ता. बाकी एस.टी.स्टॅण्ड, हायस्कूल. बऱ्यापैकी पाणी असणारी नदी, सरकारी दवाखाना, एकच मोठे हॉटेल. बाकी चहा, भजी, वडापाव यांच्या दुतर्फा टपऱ्या. चार पाच बऱ्यापैकी किराणा मालाची दुकाने, बेकऱ्या, दोन पोह्यांच्या गिरण्या हीच गावाची प्रमुख वैशिष्ट्ये. गावाच्या आसपास आणखी काही खेडी होती. अशा या आंबेगावांत बँकेचा मॅनेजर म्हणून येऊन मला दोन वर्षे होऊन गेली होती. आसपासच्या गावात बँक नसल्यामुळे बँकेत लोकांचा राबता असायचा. विशेष म्हणजे डोनेशन न देता मुलांना शाळेत प्रवेश मिळाला होता.

गाव लहान आणि हुद्याची जागा. त्यामुळे गावात खूपच ओळखी झाल्या होत्या. बँकेच्या वरच रहाण्यास मोठी जागा मिळाली होती. सौभाग्यवतीने ही चांगला जनसंपर्क साधून महिला मंडळ, भिशी यांच्या निमित्ताने बऱ्याच मैत्रिणी जोडल्या होत्या. करमणुकीची साधने नसली तरी तसा डोक्याला कोणताच ताप नव्हता. पण दोन वर्षे होऊन गेल्यामुळे मनातून आता गावाचा कंटाळा आला होता. आता यापुढे नवीन चांगल्या मोठ्या गांवी बदली झाली तर किती बरे होईल असे वाटू लागले होते. खेडेगावात किती रहायचे ?

आता बदलीच्या निमित्ताने डोक्यात विचारांनी थैमान घालायला सुरुवात केली. दोन वर्षे पूर्ण करूनही नियमाप्रमाणे हेड ऑफिस बदली करेलच अशी शाश्वती मागील अनुभवावरून अजिबात नव्हती. मनात विचार पक्का केला. हेड ऑफिसला जाऊन साहेबांना प्रत्यक्ष भेटून, त्यांना पाझर फुटेल अशा अडचणी सांगून बदली करून घ्यायची. चार दिवसांच्या रजेचा अर्ज हेड ऑफिसला पाठवला आणि आश्चर्य म्हणजे दुसऱ्या आठवड्यात रजा मंजूर झाल्याचे हेड ऑफिसकडून चक्क पत्रही आले.

अकौंटंटला टेम्परररी चार्ज देऊन मी मुंबईत दाखल झालो आणि थेट हेड ऑफिस गाठले. साहेबांना नेहमीच टूर्स असल्यामुळे आज साहेब भेटतील का नाही, मनात शंका होती. मी चौकशी केली. आजच साहेब टूरवरून आल्याचे कळले. मनात मी ईश्वराचे आभार मानले.

साहेबांच्या केबिनबाहेर बसलेल्या चपराशाला त्याने दिलेल्या कागदावर माझे नाव, ब्रँचचे नाव लिहून दिले आणि तेथेच असलेल्या खुर्चीवर साहेबांच्या कॉलची वाट पहात बसलो.

''साहेब टूरवर होते. आजच आले आहेत. टेबलावर बऱ्याच फाईली आहेत. जरा वेळ लागेल. काय बदलीसाठी चक्कर ?'' चपराशाचा आगाऊपणा.

जवळ जवळ अर्ध्या तासाने रिंग वाजली. चपराशी लगेचच तुमचा आज्ञाधारक म्हणून आत.

'अरे ते बाहेर मिरगुंडकर बसले आहेत ना, त्यांना पाठव आत.'

चपराशाने साहेबांचा निरोप दिला. म्हणाला, ''आपण लकी आहात. लवकर नंबर लागला.''

मी जरा ड्रेस नीट नेटका केला. केबिनचे दार उघडून दारातूनच विचारले.

'मे आय कम इन सर ?'

'या, बसा.'

'मी मनोहर मिरगुंडकर'

'चिठ्ठीत वाचलंय. आपण पेणचे काय ? पेणची मिरगुंडं प्रसिद्ध आहेत म्हणून सहज विचारलं. काय काम काढलंत ? थोडक्यात सांगायचं. माझ्याजवळ जास्त वेळ नाहीये.'

'सर, मला आंबेगावला येऊन दोन वर्षे होऊन गेली आहेत. तेथील हवा मला सूट होत नाही. तरी सुद्धा कोणतीही तक्रार न करता दोन वर्षे काढली. शिक्षणाची तशी चांगली सोय नाही. आईवडीलही आता थकले आहेत. त्यांना आंबेगावला आणता येत नाही. शिवाय चांगल्या डॉक्टरांची वाण आहे. आता मोठ्या गावी बदली द्या सर ! प्लीज सर!

'तुमचे वय काय ?'

'चाळीस सर'

'अरे, मग तुमचे आईवडील म्हातारेच असणार ते काय तरुण रहाणार ?'

'मधून मधून माझ्या प्रकृतीच्या तक्रारी सुद्धा असतात तर !'

'झालंय काय तुमच्या प्रकृतीला ? सिगरेट ओढत असाल !'

'नाही सर ! मी कधीच सिगरेट ओढत नाही सर !'

'मग ड्रिंक्स वगैरे ?'

'कधीच ड्रिंक्स घेत नाही सर मी !'

'पत्ते, जुगार, सट्टा वगैरे ?'

'नाही सर ! असल्या गोष्टींपासून मी दूर आहे !'

'मग रेस खेळता का ?'

'कसं शक्य आहे ते सर ? रेस म्हणजे नक्की काय हे सुद्धा मला माहीत नाही !'

'बरं ! तुम्ही सिगरेट ओढत नाही, दारू पीत नाही. जुगार-पत्ते खेळत नाही, रेस खेळत नाही. अरे, मग तुमची प्रकृती ठणठणीत असायला हवी. हे सर्व करूनही आमची प्रकृती बघा एकदम ठणठणीत. झालंय काय तुमच्या प्रकृतीला ? अजून बरीच वर्षे सर्व्हिस करायचीय तुम्हांला.'

'साहेब ! आता बायकोची डिलिव्हरी आलीय ! आईवडील इकडे येऊ शकत नाहीत, याही कारणासाठी मी बदलीची रिक्वेस्ट करतोय!' (आणखी एक लोणकढी थाप)

'अहो ! बायकोची डिलिव्हरी व्हायचीय म्हणता, त्याला मी जबाबदार आहे काय ?'

'सर माझी अगदी 'जेन्युइन डिफिकल्टी' मी तुम्हांला सांगितली. एरव्ही मी तुम्हांला बदलीसाठी रिक्वेस्ट करायला आलो नसतो ! सर ! प्लीज !'

'अजून एक वर्ष रहा आंबेगावला. मग बघू ट्रान्स्फरचे. मी तुमचा प्रोग्रेस वॉच करतो.' साहेब काहीच ऐकण्याच्या 'मूड' मध्ये नव्हते. त्यांना नमस्कार करून मी केबिनबाहेर पडलो.

दुसरे दिवशी मी आंबेगाव गाठले. बदली होण्याची शक्यता नसल्याचे दिसल्यावर कामात 'मूड' लागत नव्हता. निराश झालो होतो अगदी. एक दोन आठवडे तसेच गेले. एके दिवशी हेड ऑफिसकडून आलेली डाक बघता बघता एका पाकिटाकडे लक्ष गेले. चपराशाला लगेच ते पाकीट चाकूने नीट उघडायला सांगितले. त्यादिवशी तरी त्याने ते नीट उघडले. मी पत्र वाचले. पुन्हा पुन्हा वाचले. माझी गोव्यातील एका मोठ्या ब्रँचला बदली केल्याची ऑर्डर होती ती ! माझा विश्वासच बसेना. बरे ! तो एप्रिल महिनाही नव्हता. म्हणजे असे पत्र पाठवून 'एप्रिल फूल' कुणी करेल अशी शक्यता नव्हती. पाकीट तसेच बाजूला ठेवले. काहीच बोललो नाही. एकदा चपराशाला कळले तर ब्रँचमध्ये आणि गावभर माझी बदली झाल्याची बातमी पसरायला वेळ लागला नसता. जसं मोलकरीण या घरची त्या घरात बातम्यांची देवाणघेवाण करते, तसं बाकीची डाक शिक्के मारायला चपराशाला दिली. मनातून खूप आनंद झाला होता. कल्पना नसतानाही साहेबांनी मात्र या बाबतीत कुंबळे पेक्षाही अप्रतिम 'गुगली' टाकून मला चकवले होते.

सौ.च्या कानावर लगेच ही गोष्ट मुद्दाम घातली नाही. कारण ती या गावात चांगलीच रमली होती. त्यांचे भजनी मंडळ, भिशी वगैरे प्रोग्रॅम, मस्त रुटीन सुरू होते. उगीच मूड जायचा बाईसाहेबांचा. मग एके दिवशी संधी साधून सांगून टाकले - ''अहो दोनच वर्षे झाली आपल्याला इथे येऊन. किती चांगलं गाव आहे ! आता येथील मैत्रिणींना सोडून जायचे म्हणजे अगदी जिवावर येतं. शिवाय माझी भिशी अर्धवट सोडावी लागणार. आमच्या मंडळाचे स्नेहसंमेलनसुद्धा पुढील महिन्यात निश्चित केले आहे. पण काय हो, अशी मधेच कशी बदली झाली ? या आधीच्या गावात चांगली तीन वर्षे राहिलो होतो. ते काही नाही, बदली कॅन्सल करून घ्या. वाटलं तर मी येते तुमच्या बरोबर मुंबईला साहेबांना भेटायला.''

'अगं मला तरी कोठे बदली हवी होती ? किती मस्त गाव आहे? (थाप) पण आता हेड ऑफिस काही ऐकणार नाही. आमचे रिजनल मॅनेजर फार कडक आहेत. काय करणार ? आलिया भोगासीऽऽऽ असं म्हणून गप्प बसायचं ! पुढील आठवड्यात दुसरा ब्रँच मॅनेजर येणार आहे मला सोडवायला.'

माझ्या बदलीची बातमी गावभर पसरायला वेळ लागला नाही. गावातील तसेच आसपासच्या गावातील खातेदार आता मला भेटायला येऊ लागले.

'काय साहेब ? आम्हाला कंटाळला काय ? एवढ्या लवकर बदली ?'

'काय करणार ? हाय कमांडची ऑर्डर आहे. मला सुद्धा एवढ्यात बदली नको होती. पण नाईलाज आहे.'

'तुमच्या इच्छेविरूद्ध बदली झाली आहे ना ? मग आम्ही गावातील लोक 'सह्यांची मोहिम' हाती घेतो आणि ते सह्यांचे निवेदन तुमच्या हेड ऑफिसला पाठवतो. कशी बदली कॅन्सल होत नाही बघतो आम्ही. तुम्ही काही काळजी करू नका साहेब ! आमदार, खासदार आपली मंडळी आहेत बरं !'

संध्याकाळी घरी, हिच्या मंडळातील बायका भेटायला आल्या. जणू घेरावच होता तो !

'वहिनींकडून कळलं बदली झाल्याचे तेव्हापासून आम्हाला चैन नाही. कसा छान ग्रुप जमला होता आमचा. माझ्या मिस्टरांचा चांगला 'वट' आहे वर. अहो ! जिल्हा परिषदेच्या दवाखान्यातील एका नर्सची तीन वेळा बदली कॅन्सल करायला लावली ह्यांनी. तसेच सरकारी शाळेतल्या त्या शिक्षिकेची बदली कॅन्सल करायला ह्यांनीच पुढाकार घेतला होता. ती अगदी देव मानते ह्यांना. काही काळजी करायची नाही साहेब ! आता ह्यांना त्वरित पावले उचलायला सांगते. तुमची

बदली कॅन्सल करायला लावली नाही तर नावाची 'लक्ष्मीबाई' नाही.' मंडळाच्या अध्यक्षा.

सर्वांच्या इच्छेविरूद्ध परंतु माझ्या मनाप्रमाणे शेवटी आंबेगावाहून सुटका झाली. गोवा गाठले. सुटकेचा एक नि:श्वास. गाव मला नवीनच. तेथील आमच्या कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने सुदैवाने जागा मिळाली. अगदी ऑफिसजवळ तीन रुमचा ब्लॉक. गोव्याचे निसर्ग सौंदर्य फक्त वाचनात आलं होतं. आता प्रत्यक्ष बघावयास मिळणार होते. पहिले एक दोन आठवडे गावाची माहिती घेण्यात गेले. शेजारी काही सारस्वत आणि ख्रिश्चन बिऱ्हाडे होती. ओळखी झाल्या. फालतू चौकशा करणारी माणसे नाहीत याची खात्री पटली. जशी सवड मिळेल तशी चर्चेस, देवळे, समुद्रकिनारे, निसर्ग सौंदर्य बघून घेतले. सौ.ला कुणीतरी सांगितले होते. शांतादुर्गा देवीचे अवश्य दर्शन घ्या. नवसाला पावते ती. त्यामुळे ती शांतदुर्गा मंदिरात चांगली अर्धा तास बसून होती. एकूण काय, मुले, सौभाग्यवती गोव्यावर एकदम खूष.

संध्याकाळी एकदा ऑफिसातून घरी आल्यावर मी चहा घेत असतानाच सौ.म्हणाली.

'आज मी तुमचं मोठं काम केलंय.'

'काय विशेष ?'

'अहो ! मी पत्राने सर्वांना कळवून टाकलंय. एकदा आम्ही आहोत तर गोव्याला येऊन जा. आपला इथला पत्तासुद्धा व्यवस्थित कळवला आहे. अगदी पिनकोड सहित. म्हणजे त्यांना त्रास नको हो घर शोधण्याचा !'

'अगं पण एवढी घाई कशाला केलीस ? मी लिहिणारच होतो सर्वांना जरा स्थिर स्थावर झाल्यावर. तुम्ही बायका म्हणजे तुमच्या तोंडात, मनात काही राहील तर शपथ ! टाकलं लगेच लिहून.'

रविवारी असेच आम्ही बाजारपेठेत फिरत असता, अचानक माझ्या पाठीवर थाप पडली. मी घाबरलोच. म्हटलं पुण्याप्रमाणे इथंही सारखळी चोर आहेत की काय ? बरं झालं गळ्यात चेन नव्हती. मी दचकून मागे बघितले तर....

'काय रे मन्या इकडं कुठं ? अरे तुझा पत्ता कुठयं ? किती वर्षांनी अगदी अचानक भेटलास बघ ! ट्रीपला आलास का ? मी चाटच पडलो. माझे अगदी जुने जवळचे मित्र होते ते ! मग गळामिठी झाली.

'नाही रे ! इथंच माझी बदली झाली आहे.'

'अरे वा ! आम्हाला मंगेश पावला म्हणायचा ! आम्ही सर्वजण इथं ट्रीपला आलो आहोत. चांगलं हॉटेल शोधत होतो. बरं झालं. मंगेशाच्या आधीच तुझे दर्शन झाले. आता तुझ्याकडेच राहू दोन-तीन दिवस ! आम्हाला एकदा गोवा दर्शन घडव, मग धरू परतीची वाट !'

'अंऽऽ या ऽऽ की!' (नाही कसे म्हणणार?)

'अरे ! हा घाबरला बघ ! एकदम हो म्हणाला नाही. असा घाबरू नकोस. आठ दिवस आम्ही गोवा एन्जॉय केलाय. आज मुंबईला जाणार आहोत. तुझी जरा फिरकी घेतली.'

'तुमची फिरकी घेण्याची कॉलेजमधली जुनी सवय अजून गेलेली दिसत नाही.'

'बरे अच्छा, सी यू अगेन'.

त्यांना निरोप देऊन थोडा बाजारहाट करून घरी आलो तर बिल्डिंगसमोर एक सुमो उभी होती. एक दोन बायका, पुरुष आणि दोन मुले सामानाजवळ उभी असलेली लांबून दिसली. विचार केला, नक्कीच कुणाकडे तरी पाहुणे आले असणार ! मी थोडा पुढे गेलो तर.....

'या या मनोहरपंत ! आम्ही तुमचीच वाट पहात होतो. वर फ्लॅटला कुलूप पाहिलं आणि आलो खाली.'

'अगं सुमन कशी आहेस तू ? अर्धा तास झाला. आम्ही तुमचीच वाट पहात होतो. पत्र मिळाले ना ? मुद्दाम पाच-सहा दिवस अगोदर कळवलं होतं यांनी'

मी हबकलोच ! बाबांचे जुने मित्र होते ते ! सदाशिवराव दबडघे. ते, त्यांची पत्नी, मुलगा, सून आणि त्यांची दोन मुले 'सुखी परिवार'. विचार केला... यांना माझा पत्ता कसा मिळाला ? आणि घरच्या लोकांच्या आधीच हे वडिलांचे मित्र सहकुटुंब हजर !

'अरे ! त्याचं असं झालं. तुझ्या वडिलांची बरेच दिवसात गाठ नव्हती म्हणून आम्ही दोघं त्यांना भेटायला गेलो होतो. तेव्हाच कळलं तुझी गोव्याला बदली झाली ते. मी कधी गोवा पाहिला नव्हता. मग मल्हारपंतांकडूनच तुझा पत्ता घेतला. म्हटलं आपलंच घर आहे! अनायसे गोवा दर्शन होईल. हिनेही अगदी मनावर घेतलं. पत्र लिहलं आणि आलो. तुम्ही सर्वजण बरे आहात ना ?'

'चला बरं, मग बोलू !' (आता दुसरं काय बोलणार ?)

'अरे वा ! मस्त ब्लॉक आहे हं ! यू आर लकी.'

'आता तुम्ही जरा फ्रेश व्हा. दमून आला असणार. चहा करायला सांगतो हिला.'

आंत स्वयंपाकघरात राधाकाकू आणि हिचा संवाद चालू होता.

'ब्लॉक एकदम चांगला आहे. भाडे जास्तच असेल नाही ? पाणी चोवीस तास ना ? धुण्याभांड्याला बाई असेल ना ? खाडे असतात का ग त्यांचे ? त्यांना दिवाळी बोनस द्यायची इकडे आहे का ग पद्धत ?' या चौकसखोर प्रश्नांना सौ.खुबीदारपणे उत्तरे देत होती.

'तुमच्या गोव्यातील (कधी झाला गोवा आमचा कुणास ठाऊक!) देवळांसंबंधी खूप ऐकलंय हो ! शांतादुर्गा देवी नवसाला पावते म्हणतात. आणि मंगेशाची, रामनाथी मंदिरांची थोरवी ऐकलंय आम्ही. छान झालं हं तुमची येथे बदली झाली ते ! अनायसे आम्हाला गोवा दर्शन होणार ! तुमचं बाई बँकेतल्या लोकांचे बरे असते. दर दोन,

तीन वर्षांनी बदली. नवी गावे पहायला मिळतात. नाहीतर आमचे हे ! पोस्टात लागल्यापासून रिटायर होईपर्यंत पुण्यातच. बदली झालीच तर कधी शनवार, सदाशिव, नारायण, रास्ता, कसबा पेठ एव्हढीच यांची फिरती. त्यामुळे अगदी कंटाळा आला होता. अनायासे मनोहरचा पत्ता मिळाला नि आलो बस्स ! लोक बरे आहेत का ग इथले ? चोऱ्या माऱ्या ----- '

'फार चांगले आहेत. भीती वगैरे नाही वाटत. येथील बायका बिनधास्तपणे सोन्याचे दागिने घालून रस्त्यावरून फिरताना दिसतात. पण कुणाची चेन, पाटल्या, मंगळसूत्र बांगड्या पळवल्याचे वाचले नाही.'

'ऐकावे ते नवलच बाई ! ही सुद्धा शांतादुर्गेची कृपा.'

पाहुण्यांचा मुक्काम चांगला पाच-सहा दिवस पडला. सकाळचा चहा, नाश्ता, जेवण, दुपारचे खाणे, चहा, रात्रीचे भोजन या साऱ्यामुळे सौ.चा अगदीच पिट्टा पडला. एकदा उत्तर गोवा, एकदा दक्षिण गोवा अशा दोन ट्रीप्स करून पाहुण्यांना गोवा दर्शन घडवले. अर्थात सर्व खर्च मलाच पडला. मी त्यांना गोवा दाखवला खरा पण ट्रीपमध्ये त्यांनी मला चांगलाच इंगा दाखवला. पैसे द्यायची वेळ आली की, नुसता खिशाकडे हात नेत विचारायचे, 'अरे ! मी देऊ का ?' पण खिशातून कधी पैसे काढले नाहीत गृहस्थाने. एकूण या अनाहूत खर्चामुळे माझे महिन्याचे बजेट साफ बोंबलले आणि विशेष म्हणजे घरच्यांच्या आधीच यांनी नंबर लावला.

सहा दिवसांनी पाहुण्यांचे पुण्याकडे प्रयाण झाले आणि 'हुश्श' म्हणून मी सुस्कारा सोडला.

'काय हो ! ते म्हणत होते पत्र पाठवले होते म्हणून. पण आपणाला ते मिळालेच नाही आणि समजा, आपण कुठे गेलो असतो तर ?'

'अगं ही पुणेकरांची रीतच आहे. पत्र पाठवून-बा, तुम्हाला सवड आहे का ? तुम्ही कुठे जाणार तर नाही ना ? आम्ही तिकडे यायचे म्हणतो ही पथ्ये पाळली तर तो पुणेकर कसला ?'

म्हणता म्हणता, मला गोव्याला येऊन जवळ जवळ पाऊण वर्ष होत आलं होतं. आता एप्रिल महिना लागला. मग मे, जून मुलांना सुट्ट्या. मला तर आताच पुढचे चित्र दिसू लागले आहे. या सुट्टीत किती पाहुणे येतील. त्या सर्वांचे गोवा दर्शन, इतर खर्च. बापरे ! आता आपलं काही खरं नाही. या विचारांनीच मी गर्भगळित झालो. मलाच कशी अवदसा आठवली आणि साहेबांना माझी बदली करा म्हणून विनंती करायला गेलो. आपलं आंबेगाव बरं होतं म्हणायचं ! कुणी पाहुणे रावळे नाहीत, फार खर्चही नव्हता. शांतपणे दिवस जात होते.

झालं ! मे, जूनमध्ये बरीच पाहुणे मंडळी येऊन गोवा बघून पाहुणचार झोडून गेली. आता पाहुणे म्हटलं की अंगावर काटा येतो. पुढील वर्षापर्यंत आता निश्चिंती. आता अगदी आराम करायचा. कोठेही जायचे नाही. कम्प्लीट आराम !

असाच एकदा रविवारी आरामात पेपर वाचत बसलो होतो. तेवढ्यात....

'अहो, आराम काय करता ? तुम्हाला आता कामाला लागायला हवं ! पाहुणे येणार आहेत.'

'काय ? पुन्हा पाहुणे ?' उडालोच. 'आता कुणाचं पत्र आलंय? शाळा सुरू होऊन चांगला महिना होऊन गेलाय. कोण हे पाहुणे ? तुझी आई येणार असेल ?'

'तसे नव्हे हो ! हा घरचाच पाहुणा आहे.'

'अरे वा ! गोड बातमी आहे. म्हणजे येऊन गेलेल्या पाहुण्यांनी शांतादुर्गेला नवस केला आणि त्यांच्या ऐवजी दुर्गादेवी तुलाच पावली म्हणायचं ! इतके दिवस पाहुणे कधी वाटेला लागतील याची आपण वाट पहात होतो. पण आता येणाऱ्या घरच्याच पाहुण्याची आपण दोघांनी आतुरतेने वाट पहायची हं ! काय ?' मी पुढे काही बोलायच्या आतच ती चहा करायला निघून गेली.

- **प्रभाकर गुपचूप**, पुणे

दूरध्वनी - (०२०) २४३४८३८९

F F F F F F

## ☺☺ H टाईमपास

नवरा बायकोच्या भांडणातील विविध क्षेत्रांतील अर्धांगिनीचे उद्गार/धमक्या -

१) नावाड्याची बायको :- गेलास बुडत.

२) नाक, कान घशाच्या डॉ.ची बायको :- नाक कापीन

३) साहेबाची बायको (शाखा प्रबंधक) :- युनियनच्या कार्यकर्त्यांना तक्रार करेन.

४) शिक्षकाची बायको :- चांगला धडा शिकवीन, मला नका शिकवू.

५) वाण्याची बायको :- एकावर एक फुकट म्हणून विकेन.

६) मंत्र्याची बायको :- लफडी बाहेर काढीन.

७) इंजिनिअरची बायको :- स्क्रू घट्ट करीन.

८) पोलिसाची बायको :- हप्ते घेणार नाय.

९) ड्रायव्हरची बायको :- सिग्नल तोडू नकोस.

१०) कारकूनाची बायको :- कुरकूर करू नकोस. साहेबांना सांगेन.

११) सॉफ्टवेअर इंजिनिअरची बायको :- हार्डवेअर भंगार म्हणून विकेन.

१२) रामा गड्याची बायको :- धुलाई करेन.

**- अशोक बुटाला**, मुंबई

माहितीपूर्ण लेख

# गंगाजल

गंगानदी. त्यातील पवित्र गंगाजल जणू अमृतच. त्याच्या सेवनाने पापमुक्ती, व्याधीमुक्ती आणखीन बरचं काही. खरं खोटं देव जाणे. पण असंख्य भारतीयांचा हाच विश्वास आहे. बऱ्याच जणांचा अनुभव देखील.

ह्याच श्रद्धेचा फायदा एका राष्ट्रीय पातळीवरच्या ''मिनरल वॉटर'' बाटल्यातून पुरविणाऱ्या कंपनीने घेतला. त्यांच्यातर्फे विकल्या जाणाऱ्या पाण्याच्या बाटलीची किंमत रूपये २५ आहे. त्याचवेळेस अन्य कंपन्यांच्या तितकेच पाणी असलेल्या बाटलीची किंमत रूपये १२/१३ आहे. सर्व ठिकाणी. कारण ह्या २५ रूपये किमतीच्या बाटलीतील पाणी हिमालयीन नद्यांच्या उगमस्थळातून प्राप्त केले आहे. 'Boiled at source' असा कंपनीचा दावा आहे.

श्रद्धाळू मनाचा हा गैरफायदा आहे की खरोखरच गंगाजल पवित्र म्हणण्याइतके शुद्ध तीर्थ आहे. बऱ्याच प्रयत्नांती जमा झालेली माहिती आपणा सर्वांसाठी.

१) मसाश इमोटो - जपानी तत्त्वज्ञ - ह्यांनी काही शास्त्रीय प्रयोगांद्वारे असे सिद्ध केले की, प्रार्थना, विचार, संगीत, शब्द, नाद, स्वर ह्यांच्यापासून निर्माण होणारे तरंग परिसर पवित्र, निर्मळ होण्यासाठी, ठेवण्यासाठी खूप प्रभावी काम करतात. गंगाकिनारी वर्षानुवर्षे चालू असलेले धार्मिक कार्यक्रम, मंत्रोच्चार, पूजाअर्चा, साधुसंतांची जपानुष्ठाने ह्या सगळ्यांचा परिणाम गंगेचे पाणी - पवित्र तीर्थात रूपांतरित होण्यासाठी निश्चितच मोलाचे काम करीत असणार.

२) रुरकी विश्वविद्यालयातील डॉ.डी.अेस भार्गवांनी ३ वर्षे गंगानदीच्या पाण्याचा, परिसराचा अभ्यास केल्यावर असे निष्कर्ष काढले की तुलनात्मकदृष्ट्या केर, कचरा घाण इत्यादींमुळे दूषित झालेले गंगेचे पाणी इतर नद्यांपेक्षा १५ ते २० पट लवकर स्वच्छ होते. कारण Bio Chemical Oxygen demand पातळी लवकर कमी करण्याची क्षमता गंगेच्या पाण्यात आहे.

३) १९२४ ते १९३१ ह्या कालावधीत डॉ.अेफ कोहीमान, फ्रान्सचे डॉ.हटेल, जर्मनीचे डॉ.जे.ओलीवार ह्यांनी केलेल्या संशोधनाअंती असे आढळून आले की गंगेचे पाणी तुलनात्मक दृष्ट्या जास्त शुद्ध आहे. ते आरोग्यदायी आहे. त्यात रोगकारक, अपायकारक, जीवजंतू, किटाणूंचा त्वरित नाश होतो.

४) युरोपियन डॉ.हाकींस ह्यांच्या म्हणण्यानुसार गंगेच्या तीर्थात दोषनाशक गुण आहेत. त्यात अशी काही रसायने आहेत की ज्यामुळे जीवाणू निर्माण होण्यास प्रतिबंध होतो. जीवाणू नष्ट होतात. पाणी प्रदूषणमुक्त असल्याने रोगराई फैलावण्यास प्रतिबंध होतो.

५) 'गुडहेल्थ' नावाच्या एका ब्रिटिश नियतकालिकाने अशी माहिती प्रसिद्ध केली आहे की टेम्स नदीचे पाणी साठवून ठेवले असता लवकर दूषित होते. खराब होते. गंगा नदीचे पाणी त्यामानाने जास्त दिवस शुद्ध राहते.

६) मॅकग्रील विश्वविद्यालयातील एका प्राध्यापकाने काही वर्षांपूर्वी सप्रयोग असे सिद्ध केले की काही प्रकारचे किटक, जीवजंतु गंगेच्या पाण्यात ३-४ तासांचे आत नष्ट होतात.

७) १९६० चे दरम्यान थिओडोर श्वेंट, जॉर्ज ॲडमस्, जॉन विक्स ह्यांनी केलेल्या संशोधनाचे निष्कर्ष असे आहेत.

गंगा व तिच्या उपनद्या ज्या डोंगर, दऱ्या खडकाळ भागातून वाहतात, त्या उंचसखल भागामुळे पाण्याची जी लयबद्ध हालचाल होते, त्यामुळे पाण्याचा जिवंतपणा टिकविण्यास खूप मदत होते. पाण्याच्या खळखळ वाहण्यामुळे, धबधब्यांमुळे, घुसळले जाण्यामुळे पाण्यातील केर कचरा, दुषित घटक बाजूला सारले जाण्याची प्रक्रिया नैसर्गिकरीत्या होते. ह्या स्वच्छता प्रक्रियेबरोबरच त्यातील प्राणवायूचे प्रमाण वाढते. रोगजंतू इ. आपोआप नष्ट होतात व उगमस्रोताइतकेच प्रदूषणमुक्त स्वच्छ पाणी सर्व ठिकाणी उपलब्ध होते.

ह्या प्रयोगांचा पाया असलेली प्रत्यक्ष नैसर्गिक वैज्ञानिक कारणे..

गंगा नदी प्रत्यक्ष जनसंपर्कात येण्यापूर्वीचा तिचा व उपनद्यांचा प्रवाहाचा खूप मोठा भाग जंगल, पर्वत इ.मुळे निर्मनुष्य व पर्यायाने प्रदूषणमुक्त असतो.

प्रवाह खूप मोठा व खोल असल्याने त्यात कासव, मासे, बेडूक इ. प्राणीही भरपूर प्रमाणात असतात जे पाण्यातील घाण, त्याज्य पदार्थ खाऊन टाकून पाणी स्वच्छ ठेवण्यास हातभार लावतात.

हिमालयातील नद्या व त्यांच्या उपनद्या ह्यांचे उगमस्थान समुद्रसपाटीपासून सुमारे ४००० मीटर उंच असलेल्या बर्फाच्छादित पर्वतांमध्ये आहे. वातावरण अति शीत असल्याने रोगराईस कारणीभूत होणारे रोगजंतू, कीटाणू त्या वातावरणात जिवंत राहू शकत नाहीत. उगमस्थानच प्रदूषणमुक्त असल्याने, स्त्रोत व पुढील प्रवाह देखील तसाच राहतो.

प्रवाहाच्या मार्गावर हिमालयातील जंगलांमध्ये औषधी वनस्पतींची विपुलता, मुबलकता आहे. त्यांच्या पानं, फुलं, फळे, मुळे ह्यांच्या संपर्काने गंगेच्या पाण्याचा 'किटक नाशक' गुणधर्म कल्पनातीत प्रभावी ठरतो. तसेच डोंगरातील चुनखडी, गंधक इत्यादींचे संपर्काने व मार्गात असलेल्या उष्ण पाण्यांच्या कुंडांमुळे (सहायक नदी अलकनंदा, बद्रीनाथनगर येथील ३ गरम पाण्याची तळी) गंगेचे पाणी सर्वार्थाने शुद्ध, स्वच्छ, आरोग्यवर्धक होते.

वरील सर्व मुद्यांचा स्वतंत्रपणे व एकत्रितरीत्या विचार केल्यास उगमस्थान, प्रवाहाचा मार्ग, परिसर ह्या सगळ्यांचा परिणाम म्हणून गंगेचे पाणी तुलनात्मकदृष्ट्या जास्त 'शुद्ध' राहण्याची प्रक्रिया सतत चालू राहते. त्यामुळे हे पाणी पवित्र तीर्थ ह्या संज्ञेस पात्र ठरते.

शुचिर्भूत, पवित्र, तीर्थ हे शब्द स्वच्छ, शुद्ध, निर्मळ प्रसन्न ह्यांचेसाठी कालानुरूप वापरले जाणारे प्रतिशब्दच असावेत. कालौघात त्यावर पाप पुण्याचे संस्कार झाले असावेत व ते जास्त भारी पडले. दुसरे काय ?

**- नी.व.ओढेकर,** नाशिक

# H तेजाचे पूजक आम्ही !

MMMMMMMMM

होय, आम्ही तेजाचे पूजक आहोत. आम्ही तेजाचे उपासक आहोत. आम्ही तेजाचे-प्रकाशाचे पाईक आहोत. ज्या-ज्या ठिकाणी आम्हाला तेजाचा किंवा दिव्यत्वाचा साक्षात्कार होतो, त्या-त्या ठिकाणी नतमस्तक होण्याची आमची वृत्ती आहे. त्या दिव्यत्वाला, त्या तेजाला आमचे दोन्ही हात आपोआप जोडले जातात. 'दिव्यत्वाची जेथ प्रचीती, तेथे कर माझे जुळती !' ही केवळ एक सामान्य काव्यपंक्ती नाही, तर तो आमच्या वृत्तीचा, स्वभावाचा कवीच्या प्रभावी शब्दात व्यक्त झालेला सहजोद्गार आहे ! तेजाची-दिव्यत्वाची पूजा करणे ही आमची सहस्रावधी वर्षांची परांपरा आहे. पिढ्यानुपिढ्यांचे आमचे हे संस्कार आहेत. आमची ती संस्कृती आहे. 'दिव्या दिव्या दीपत्कार' असं म्हणत 'दिव्याला नमस्कार' करण्याचे संस्कार अगदी बालवयापासूनच आमच्यावर घडविले जातात.

दिवाळीचा सण म्हणजे सर्व सणांचा जणू साक्षात राजाच होय. सर्वात आनंदाचा, सर्वात उत्साहाचा अन् सर्वात जल्लोषाचा सण म्हणजे 'दिवाळी' किंवा 'दीपावली' ! या सणाच्या नावातच 'दिवा' किंवा 'दीप' सामावलेला आहे. आपल्या जीवनातील दिव्याचं किवा दीपाचं महत्त्व सिद्ध करणारा याहून दुसरा कोणता पुरावा हवा? दिवाळीला घरोघरी ओळीने 'पणत्या' लावल्या जातात. दारापुढे आकाशदीप लावले जातात, पणत्यांच्या प्रकाशात रांगोळ्यांचं सौंदर्य उजळून निघतं. तेवणाऱ्या पणत्यांच्या ओळींमधून घडणारं दिवाळीचं मनोज्ञ दर्शन शब्दांतून वर्णिता येईल का ? तो अनुभव प्रत्यक्ष घेणंच अधिक श्रेयस्कर नि आनंददायक असतं.

तेवणारी पणती असो, मेणबत्ती असो, निरांजन असो, समई असो, साधा कंदिल असो, विजेचे रंगीबेरंगी दिवे असोत किंवा बॅटरी म्हणजे विजेरी असो, हे सर्व प्रकाशाचे दूत आहेत. तेजाचे-प्रकाशाचे वाहक वा प्रतिनिधी आहेत. भोवतालचा अंधार नष्ट करून आपल्या शक्तीनुसार प्रकाश पसरवणं हेच सर्वांचं ध्येय असलं, तरी त्या प्रत्येकाचं रूप वेगळं, आविष्कार वेगळा. त्या प्रत्येकात असलेली प्रकाशाची ज्योत नि ज्योतीतला प्रकाश महत्त्वाचा. 'ज्योतीने तेजाची आरती' करण्याची आमची परंपरा आपण दर दिवशी जपत असतो. देवाची पूजा व आरती करताना आपण त्या परमेश्वररूपी तेजाला निरांजनाने ओवाळतोच. 'गगन सदन तेजोमय' व्हावे ही आपली मनीषा असते. 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही आपली प्रार्थना असते. अंधारातून प्रकाशाकडे, 'तिमिरातून तेजाकडे' आपला प्रवास चालू असतो. अज्ञानरूपी अंध:कारदेखील आपण 'ज्ञानदीप' लावून नष्ट करण्याचा प्रयत्न करतो.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांना झगमगणाऱ्या लक्षावधी विजेच्या दिव्यांपेक्षा माजघरात मंदपणे तेवणाऱ्या पणतीच्या किंवा समईच्या ज्योतीची-त्या मंद दिव्याची ओढ वा आकर्षण अधिक आहे ते ही भावना -

''नवलाख तळपदी दीप विजेचे येथ ।<br>
उतरली तारकादळे जणू नगरात ।।<br>
परि स्मरते आणिक करते व्याकुळ केव्हा ।<br>
त्या माजघरातील मंद दिव्याची वात ! ।।''

- किती समर्पक शब्दात व्यक्त करतात !

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी आपल्या आराध्य दैवताचं, पांडुरंगाचं केलेलं वर्णन पहा -

''पांडुरंग कांती, दिव्य तेज झळकती ।<br>
रत्नकीळ फांकती प्रभा ।।<br>
अगणित लावण्य, तेज पुंजाळले ।<br>
न वर्णवे तेथीची शोभा ।।''

- अशा या दिव्य तेजाने प्रत्येक जणू दिपून जाईल यात काय शंका?

''दिव्या-दिव्याची ज्योत सांगते, तुझी नि माझी प्रीती ।'' - या भावगीताच्या ओळीत प्रेमभावना व्यक्त करण्याची दिव्यातील ज्योतीची वृत्तीदेखील शब्दबद्ध केलेली आढळते.

'चमचम चंदेरी तेजाची न्यारी दुनिया !' ही तर सर्व चित्रपट - रसिकांना गेल्या अनेक वर्षांपासून भुरळ घालत आली आहे.

आकाशातील 'तेजस्वी ताऱ्यां'चे जसे आपल्याला आकर्षण असते, तसेच आपले संतान - आपला पुत्र सूर्याप्रमाणे तेजस्वी निपजावा अशी अनेक जणांची देवाजवळ प्रार्थना असते. तेज:पुंज व्यक्तिमत्त्वाद्वारे आगळ्याच तेजाचे दर्शन घडत नाही का ? हे व्यक्तिमत्त्व समाजाच्या आदरस्थानी विराजमान होते. साक्षात 'तेजोनिधी' असलेल्या भगवान श्री सूर्यनारायणाची आपण रोजच प्रार्थना-पूजा करतोच ना ? मंदिरासमोरील 'दीपमाळ' मंदिराच्या सौंदर्यात भरत घालते त्याचप्रमाणे आपली दिव्य परंपरा जपत असते.

बहुतेक सर्व सभा-समारंभांमध्ये 'दीपप्रज्वलनाने शुभारंभ करण्याचा आपला प्रघात असतो. प्रत्यक्ष दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पतीला पत्नी. तर भाऊबीजेला भावाला बहीण ओवाळते ती चांदीच्या तबकातील निरांजनाने. औक्षण करण्याची आपली प्रथा जीवनातील तेजाचं महत्त्व सिद्ध करते.

आपले सारे जीवनच तेजाने-दिव्यत्वाने व्यापून जावे, आपला पुढील मार्ग त्या तेजाने उजळून निघावा आणि सर्वांना सुख-समाधान-ऐश्वर्य प्राप्त व्हावे अशी 'दिवाळी' च्या वा 'दीपावली' च्या प्रकाशमय सणानिमित्त परमेश्वरापाशी प्रार्थना ! शुभं भवतु !! शुभ दीपावली !!!

- **क्रांतिसेन आठवले,** पुणे<br>
भ्रमणध्वनी : ९८६९९४१६९१.

ZZZZZZZZZZ

# H शेक्सपियरच्या देशात-
# आचार्य अत्रे साहित्य दर्शन: मु.पो.लंडन

दिनांक १ जानेवारी २००७ रोजी सकाळीच आकाशवाणीवर नवीन वर्षा निमित्त मान्यवर व्यक्तींचे ''२००७ मधील संकल्प'' हा कार्यक्रम ऐकल्यावर मी पण ह्यावर्षी लंडन येथे 'आचार्य अत्रे साहित्य दर्शन' आयोजित करण्याचा संकल्प केला. लंडन ! ब्रिटिश साम्राज्याची वैभवशाली परंपरा असलेली रमणीय नगरी ! डॉ.सॅम्युएल जॉन्सन ह्यांनी लंडनचे महात्म्य खालील मोजक्याच पण अर्थपूर्ण शब्दात वर्णिले आहे -

"When a man is tired of London he is tired of Life. For there is in London all that Life can afford." (जो लंडनला कंटाळला तो आयुष्यालाच कंटाळला. जीवनाला लागणारे सर्व काही लंडनमध्ये आहे.) आचार्य अत्रे ह्यांनी त्यांना प्रिय असणाऱ्या लंडन नगरीचे वर्णन ''मी कसा झालो.'' व ''कऱ्हेचे पाणी'' या आत्मवृत्तात सुंदररीत्या केले आहे.

१९३२ साली स्थापन झालेल्या महाराष्ट्र मंडळ, लंडन ह्या संस्थेचा अमृतमहोत्सव सप्टेंबर २००७ मध्ये भव्यदिव्य प्रमाणात साजरा होणार असल्याचे मी वाचले होते. शिवाय लंडन येथे अनेक मराठी कुटुंबे स्थायिक झालेली आहेत. 'प्रल्हाद केशव अत्रे, बी.ए. बी.टी. टी.डी. (लंडन)' ही ओळ एखाद्या कवितेच्या ओळीप्रमाणे मराठी माणूस म्हणत आला आहे. मी १२ जानेवारी २००७ रोजी महाराष्ट्र मंडळ, लंडन या संस्थेला पहिले विनंतिवजा पत्र आवश्यक त्या कात्रणांसह/लेखांसह पाठविले आणि मनात म्हटले, 'चला, श्रीगणेशा तर झाला'!

माझी कन्या आणि जावई लंडन येथेच असल्याने तेथे राहण्याचा प्रश्न नव्हता. पण एवढा मोठा 'आत्रेय खजिना' न्यायचा कसा ? आणि खर्चाचे काय ? ह्या समस्या/अडचणी मनाला सारख्या भेडसावीत होत्या. पण काहीही झाले तरी अटकेपार झेंडा रोवायचाच हा निर्धार मनाशी पक्का होता. कारण केवळ प्रवासी म्हणून लंडन दौरा करण्याचा माझा इरादा नव्हता. तर गेली ४५ वर्षे बँकेत नोकरी करत करत जोपासलेला छंद सॅनहोजे (अमेरिका) येथील प्रदर्शनाप्रमाणेच आता ब्रिटनमधील अत्रेप्रेमी मराठी माणसांना दाखवावा ही ईर्षा मनात बाळगली होती. तीच जिद्द, तीच ईर्षा पूर्ण करण्यासाठी माझी धडपड सुरू होती. त्याप्रमाणे १६ ऑगस्ट २००७ रोजी निवडक अत्रे वाङ्मय व प्रदर्शनाचे साहित्य मी स्वखर्चाने एअरकार्गोने (रू.५००० खर्चून) लंडनला पाठविले. कारण महाराष्ट्र मंडळाचा अमृतमहोत्सव १ व २ सप्टेंबरला साजरा होणार होता. वेळ फारच कमी असल्याने धाडस करूनच प्रदर्शनाचे साहित्य स्वतंत्रपणे पाठविले आणि नंतर मी सपत्नीक २१ ऑगस्टला साहेबाच्या देशात जाऊन धडकलो एकदाचा. लंडनला गेल्यावरही डोक्यात 'आधी लगीन कोंडाण्याचे' हाच विचार होता. महाराष्ट्र मंडळाचा अमृतमहोत्सवी समारंभ दिनांक २६ व २७ ऑगस्टपासूनच डॉली हिल्स लंडन येथे सुरू झाला होता. त्या कार्यक्रमाला मी मुद्दाम उपस्थित राहिलो. त्यामुळे अनेक नामवंत नवीन मराठी व्यक्तींचा परिचय झाला व माझ्या अत्रे प्रदर्शनाची जाहिरातही व्यवस्थितपणे करता आली. त्यामुळे अनेकांना या आगळ्या वेगळ्या उपक्रमाची कल्पना आली एवढे खरे.

दिनांक १ व २ सप्टेंबर २००७ रोजी अमृतमहोत्सवाचा मुख्य समारंभ विश्वविख्यात शास्त्रज्ञ डॉ.रघुनाथ माशेलकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली ईलींग येथील व्हिक्टोरीया हॉलमध्ये आयोजित केला होता. मी लंडनमध्ये क्रॉयडन (उपनगर सरेप्रांत) येथे राहत होतो आणि प्रदर्शनाचे ठिकाण ३ तासांच्या अंतरावर होते. तेथे जाण्यासाठीही दोन बसेस कराव्या लागत होत्या. शिवाय वाहतुकीचाही प्रश्न होताच. कार्यक्रम सकाळीच सुरू होणार होता. त्यापूर्वीच प्रदर्शनाचे सर्व साहित्य मला हॉलवर नेऊन ठेवणे आवश्यक होते. पण इतक्या लांब न्यायचे कसे ? आपल्या इकडच्याप्रमाणे रिक्षा किंवा हमाल तेथे काहीच नव्हते. टॅक्सीज होत्या पण खर्चीक भाडे आकारणीच्या. म्हणून ३१ ऑगस्टलाच दुपारी सर्व सामान ट्रॉलीमधून बसस्टेशनपर्यंत एकट्यानेच नेले. ब्रिटिशांच्या पद्धतीनुसार सर्व काम आपले आपणच पार पाडावयाचे असते. किंग्जस्टन येथे पहिला बस प्रवास पूर्ण झाला आणि ईलींगची दुसरी बस पकडली. लंडनला बसमध्ये ट्रॉलीज, स्ट्रोलर सुद्धा घेतात. आपण आपल्या देशातही एखाद्या नवीन शहरात गेलो तर प्रथम थोडे गांगरतोच. येथे तर मी साक्षात दुसऱ्या देशात, अनोळखी प्रदेशात आणि कोणीही परिचित नसलेल्या ठिकाणी ! पण आश्चर्याची बाब म्हणजे माझी 'ही' अवस्था पाहून बसस्टॉपवर लंडनचा बस ड्रायव्हर जागेवरून उठून माझ्या मदतीला आला आणि बसस्टॉपवर ट्रॉलीसह सर्व साहित्य उतरविण्यास मदत केली. मला त्यावेळी आपल्याकडील बस सेवेची उगीचच आठवण झाली.

दिनांक १ सप्टेंबर २००७ रोजी सकाळी लवकर जाऊन व्हिक्टोरीया हॉलवर अत्रे प्रदर्शनाची मांडणी केली. व्हिक्टोरीया हॉलचे वर्णन काय करावे ! ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या अनेक खुणा ह्या वैभवशाली हॉलमध्ये जाणवत होत्या. अशा राजेशाही हॉलमध्ये एका मराठी सारस्वताचे साहित्य प्रदर्शन माझ्यासारख्या आयुष्यभर बँकेत डेबीट/क्रेडीट केलेल्या माणसाला आयोजित करण्याची सुवर्णसंधी माझ्या नशीबाने आणि अत्रे यांच्या भाग्याने मला दिली. याबद्दल मी मनातून अत्यंत समाधानी व आनंदी होतो. संयोजकांनी मला चार मोठी टेबले दिली. मी प्रवेश दाराशीच 'आचार्य अत्रे साहित्य दर्शन' हा मोठा बॅनर लावला होता. यामुळे सर्वांचे लक्ष वेधले जात होते. विशेष म्हणजे प्रदर्शनाच्या मांडणीच्या वेळी तेथे कामावर असलेले कृष्णवर्णीय कर्मचारी व अधिकारी मला आवश्यक ते सर्व सहकार्य

करीत होते. समारंभ सकाळी १० वाजता सुरू होणार असल्याने ९ वाजल्यापासूनच लंडनस्थित अनेक मराठी कुटुंबे, निमंत्रित महनीय व्यक्ती आणि पाहुणे मंडळी हॉलवर येत होती. मंडळाचे पदाधिकारी ध्वनिक्षेपावरून सर्वांना प्रदर्शन पहाण्याविषयी आवाहन करीत होते. त्यामुळे अनेकांनी प्रदर्शनाला आवर्जून भेट दिली. मुंबईला शिवाजीपार्क, दादर येथे राहणारे एक मराठी गृहस्थ तर भलतेच प्रभावित झाले होते. कारण शिवाजी पार्कवरील आचार्य अत्र्यांच्या प्रचंड सभा हंशा आणि टाळ्यासह त्यांनी प्रत्यक्ष अनुभवल्या होत्या.

ह्या प्रदर्शनात आचार्य अत्रे ह्यांची निवडक पुस्तके, (नवयुग वाचन माला, अरुण वाचनमाला, अत्रे उवाच इ.) त्यांचे विविध लेख, गाजलेले व नावाजलेले मृत्युलेख, दै.मराठा, सांज मराठा, साप्ताहिक नवयुग, तुकाराम इ. चे दुर्मिळ अंक, निवडक अग्रलेख, अत्र्यांच्या हस्ताक्षरातील काही इंग्रजी/मराठी पत्रे, अत्रे विशेषांक, छायाचित्रे, श्यामची आई, महात्मा फुले, ब्रह्मचारी ह्या चित्रपटांच्या चित्रफिती, तसेच लग्नाची बेडी, तो मी नव्हेच, मोरूची मावशी ह्या नाटकांच्या ऑडिओ/व्हिडिओ सिडीज/कॅसेटस् अत्रे यांच्या आवाजातील भाषणांच्या ध्वनिफिती इत्यादींचा समावेश होता.

ह्या निमित्ताने लंडन येथील मराठी बांधवांनी व आजूबाजूच्या शहरातील अनेक मराठीप्रेमी जनतेने प्रदर्शनाला भेट देऊन अत्रे युगातील अनेक स्मृतींना उजाळा दिला व ह्या वेगळ्या उपक्रमाबद्दल मला समक्ष भेटीद्वारे व अभिप्रायाद्वारे विशेष धन्यवाद दिले. समारंभाच्या वेळी हॉलमध्ये आचार्य अत्रे यांच्या आवाजातील ध्वनिफीत ऐकताना अनेक जण अत्र्यांच्या स्मृतींनी भारावून गेल्याचे जाणवत होते. 'आजीचे घड्याळ', 'खाली आणि वर' ह्या केशवकुमारांच्या कविता व 'दिनूचे बील' हा हृदयस्पर्शी धडा वाचून अनेकजण आपल्या बालवयात व शालेय जीवनात हरवले होते.

लंडनच्या या प्रदर्शनाला विश्वविख्यात वैज्ञानिक डॉ.रघुनाथ माशेलकर, पुण्याचे बांधकाम व्यावसायिक डी.एस.कुलकर्णी, कवी अशोक नायगावकर, लंडनस्थित व अत्रे यांचे स्नेही सर्वश्री मुकुंद नवाथे, मधु अभ्यंकर, संगीतकार डॉ.सलील कुलकर्णी, गायक राहुल देशपांडे यांनी आवर्जून भेट दिली.

दि. २ सप्टेंबर २००७ रोजी सायंकाळी ह्या संस्मरणीय अमृतमहोत्सवी समारंभाची सांगता झाली. सर्वांना समारंभाच्या पदाधिकाऱ्यांनी श्रीफल देऊन प्रेमाने निरोप दिला. माझा संकल्प पूर्ण झाल्यामुळे मी अतिशय समाधानी व आनंदी होतो. पुढील वास्तव्यात युरोपातील काही देशांचा दौरा केला. लंडन नगरीचे व केंब्रीज विश्वविद्यालयाचे दर्शन घेऊन २५ नोव्हेंबर २००७ रोजी 'आचार्य अत्र्यांसह' भारतात परतलो.

– **सुहास बोकील,** पुणे

भ्रमणध्वनी – ९८९०८७०२१८

F F F F F

## 0 माझा आरसा आणि मी

आरशाला मी तुच्छतेने म्हणालो...
बघ दर्पणा बघ ।
माझं राजस प्रतिबिंब बघ ।
आकर्षक सुंदर लावण्य बघ ।
उसळतं चैतन्य बघ ।
सळसळतं तारुण्य बघ ।
डोळ्यांमधलं तेज बघ ।
ओठांवरलं स्मित बघ ।
मदनाचा पुतळा मी, सौंदर्यवान आहे ।
अप्रतिम सौंदर्याचा मला अभिमान आहे ।
बघ ! माझ्यामुळेच तुझी शान आहे ।।१।।
आरसा छद्मीपणे हसत मला म्हणाला....
बाह्य सौंदर्याला मी भाळणार नाही ।
साक्ष खोटी कधी नोंदणार नाही ।
अहंकाराची स्तुती मी करणार नाही ।
''अंतरंग माझंच स्वच्छ पारदर्शक आहे;
म्हणून प्रतिबिंब तुझं रुबाबदार आहे ।''
अंतरंगात तुझ्या, थोडं वाकून बघ ।
मनातलं मालिन्य, मनश्चक्षूने बघ ।
अंत:करण तुझं गढूळ आहे ।
विचार स्वार्थी, प्रबळ आहेत ।
वासना अति लंपट आहे ।
अंतरंगात सौंदर्य कुठं आहे ?
अभिमान वाटावा, असं तुझ्यात काय आहे ? ।।२।।
आरसा माझी समजूत काढताना म्हणाला...
सत्य कटू असतं, पटतं का बघ !
मनाचं सौंदर्य तू तपासून बघ ।
देहाचं सौंदर्य आरशात दिसतं ।
अंत:करणाचं सौंदर्य, त्यात कुठे असतं ?
देहाचं सौंदर्य, तू त्याग भावनेतून बघ ।
अंत:करण लोण्यासम, वितळते का बघ ।
कुरुपतेत सुद्धा सौंदर्य असतं ।
सॉक्रेटिसाचं सौंदर्य विद्वत्तेत असतं ।
''बाह्य सौंदर्याचा अहंकार त्यागून बघ ।
मनाच्या सौंदर्याने जग जिंकून बघ ।''
कटू बोललो म्हणून रागावू नको ।
ऋणानुबंध स्नेहाचे दुरावू नको ! ।।३।।

– **पी. बी. भेंडे,** पुसद

स्मृतीगंध

# H गोष्ट लाखाची

नुकतेच स्टेट बँक ऑफ इंडिया कर्मचारी संघाचे कोल्हापूर व सांगलीसाठी विभागीय अधिवेशन महावीर कॉलेजच्या सभागृहात संपन्न झाले. त्यास महावीर कॉलेजचे प्रि.सुनीलकुमार लवटे अध्यक्ष म्हणून लाभले होते. डॉ.लवटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बँकेच्या सेवेसंबंधी चिमटे काढताना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त वि.स.खांडेकर यांचे एक उदाहरण सांगितले. वि.स.खांडेकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर इतरांचे बरोबर बऱ्याच बँक प्रतिनिधींनी त्यांना पुरस्काराबद्दल अभिनंदनाचे पत्र देताना पत्राखाली एक विशेष ओळ 'पुरस्कार प्राप्त रक्कम आपल्या बँकेत ठेव म्हणून ठेवण्याची' विनंती केली होती. त्यावेळी वि.स.खांडेकरांनी नम्रपणे एका बँक प्रतिनिधीला सांगितले की 'मला पुरस्कार मिळण्यापूर्वी ज्या बँकेने उत्तम सेवा दिली त्या बँकेचा या रकमेवर खरं म्हणजे पहिला अधिकार आहे. यामध्ये डॉ.लवटे यांना बँकेच्या सेवेचे महत्त्व आणि ग्राहकांच्या भावना काय असतात हे सांगणे अभिप्रेत होते. त्यावेळी झटकन उठून मला अभिमानाने असं सांगावसं वाटलं की 'सेवेला नक्कीच महत्त्व असतं म्हणूनच वि.स.खांडेकर यांनी पुरस्काराची रक्कम रू. १ लाख (डॉ.लवटे यांनी ५ लाखांचा उल्लेख केला होता.) आपल्या स्टेट बँकेच्या कोल्हापूर मुख्य शाखेत ठेव म्हणून ठेवली होती आणि त्याला आमचा खांडेकर साहेबांना घरपोच सेवा देणारा सहकारी श्री.प्रकाश हळबे कारणीभूत होता.

भाऊसाहेबांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर आमचे त्यावेळचे शाखा प्रबंधक श्री.जी.आर.देशपांडे, प्रकाश हळबे, मी व आणखी एक दोन सहकारी राजारामपुरीतील खांडेकर यांचे बंगल्यात त्यांचे अभिनंदन करण्यासाठी पुष्पगुच्छ घेऊन गेलो होतो. त्यावेळी त्यांचा सत्कार करण्यासाठी बरीच मंडळी जमा झाली होती. आम्हीही त्यांचे अभिनदंन करून पुरस्कार प्राप्त रक्कम आमच्या बँकेत ठेवण्याची अर्थातच विनंती केली होती. त्यावेळी त्यांनी प्रकाश हळबे यांचेकडे बोट दाखवून हाच काय ते ठरवेल असे सुचविले होते आणि हळबे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे सदरची रक्कम ठेव म्हणून बँकेत आली होती.

त्यावेळी आणखी एक गोष्ट मला प्रकर्षाने आठवली होती ती म्हणजे मी तिसरी चौथीत शाळेत असताना आम्हाला मराठीच्या पुस्तकात वि.स.खांडेकर यांचा 'एक लाखाचे बक्षीस' हा धडा अभ्यासाला होता. त्यामध्ये एक लाखाचे बक्षीस मिळाल्यावर घरातील कुणा कुणाचे काय मनसुबे असतील याची कल्पना केली होती. त्यावेळी ते कोल्हापुरात मंगळवार पेठेत खासबाग जवळ रहात होते. त्यांचे घरापासून ३/४ गल्ल्या ओलांडून आम्ही रामगल्लीत रहात होतो. त्यावेळी रोज रात्री एक बाई आपल्या मुलीला बरोबर घेऊन रात्री ८।। ते ९ च्या दरम्यान आर्तस्वरात ''पंढरीनाथा मायबापा, विठ्ठला पांडुरंगा, कुणीतरी या गलीमंदी आर्धी कोर भाकरीची दया करा,'' त्या बाईची ती आर्त पुकार त्या भागातील सर्वांच्या परिचयाची होती. त्यावेळी खांडेकर साहेबांचे घरीही तिच्या भिक्षा मागण्यासंबंधीही चर्चा असायची. तेव्हा लाखाचे बक्षिसासंबंधी चर्चा करताना त्यांनी आपल्या नातीला सहज विचारले, 'आपल्याला एक लाखाचे बक्षिस मिळाले तर तू काय करशील ?' त्यावेळी पटकन तिने तिच्या भाबड्या स्वरात उत्तर दिले होते की, ''आजोबा आपण एक लाखाच्या भाकरी घेऊ आणि त्या पंढरीनाथ बाईला देऊ या का ?'' तिचे हे उत्तर ऐकून भाऊसाहेब सद्गदित झाले होते आणि अभ्यासात वाचताना आम्हालाही भरून आलं होतं, कारण ती पंढरीनाथ बाई आमच्याही परीचयाची होती आणि त्यावेळी खांडेकरांच्या लेखणीतून 'एक लाखाचे बक्षीस' ही कथा जन्माला आली होती.

वि.स.खांडेकरांची आणखी एक सद्गदित करणारी आठवण म्हणजे त्यांचे देहावसान. आयुष्यात मोठा माणूस कोणाला म्हणावयाचे तर ज्याचे प्रेतयात्रेस न बोलावता स्वत:हून होणारी प्रचंड गर्दी. खांडेकरांचे निधनाची वार्ता वाऱ्यासारखी अवघ्या कोल्हापूरात पसरली आणि त्यांना श्रद्धांजली म्हणून सर्व शाळा, हायस्कूल, कॉलेजेस पटापट सोडून देण्यात आली होती. एरव्ही कधी अचानक शाळेला सुट्टी मिळाली की सर्व विद्यार्थी हुर्यो करत, सुट्टीचा आनंद घेण्यासाठी घरी परतायचे. पण यावेळी आम्हाला असं पहायला मिळालं की आम्हीही बँकेतील मंडळी भाऊसाहेबांच्या निधनाची वार्ता कळताच हार घेऊन त्यांच्या निवासस्थानी गेलो होतो व त्यांचे अंत्यदर्शन घेतले होते. परत येताना आम्हाला दिसलं की वेगवेगळ्या शाळा, हायस्कूलमधील प्रभातफेरी सारखे सर्व दिशांनी रांगेने विद्यार्थ्यांचा राजारामपुरीत खांडेकर यांच्या बंगल्याकडे ओघ लागला होता आणि खांडेकर यांच्या बंगल्यासमोर मोठ्या रांगांतून त्यांचे अंत्यदर्शन शिस्तबद्धपणे घेत होते. ही घटना माझ्या आयुष्यातील पहिली किंवा शेवटचीच पहायला मिळणारी असेल. एखाद्या व्यक्तीने आयुष्यात यापेक्षा अधिक काय कमवयाचं याचाच मी विचार करीत राहिलो.

डॉ.लवटे यांनी खांडेकरांच्या स्मृतीला दिलेला उजाळा, त्यांनी बँकेत ठेवलेली पुरस्कार प्राप्त एक लाखाची रक्कम त्यांची 'एक लाखांचे बक्षीस' ही कथा आणि त्यांच्या अंत्यदर्शनास लाखोंची उपस्थिती अशी ही 'गोष्ट लाखाची' (लाखमोलाची) इतरांनाही समजावी याचसाठी हा अट्टाहास.

– **अरविंद नलवडे,** कोल्हापूर


भ्रमणध्वनी – ९९२२४३२२३७

H H H H H H H

ललितलेख

## H पाने उलटताना

''किती भराभर पानं उलटती आहेस, अशाने पुस्तक फाटेल



ना? आता तर नुकत्याच शाळा सुरू झाल्या आहेत. अजून सबंध वर्ष जायचे आहे. पानं जरा हळू उलटत जा'' मी माझ्या नातीला समजावले.

''अगं आजी, आम्हाला बाईंनी सांगितले की तुम्ही धडा नीट वाचलात तर त्याच्यातच तुमच्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला मिळतील'' नात म्हणाली.

खरंच आहे बाईंचं म्हणणं. आपण जो धडा शिकतो त्यावरच्या प्रश्नांची उत्तरे त्या त्या धड्यातच असतात. पण आपण त्या धड्याचा नीट अभ्यासच करत नाही. प्रत्येक ओळ शांतपणाने अभ्यासली पाहिजे. भराभर पुढे जाण्याने अर्थ समजत नाही. तीच तीच ओळ पुन्हा पुन्हा वाचावी लागते. नीट लक्षात येईपर्यंत. किती गहन अर्थ भरला आहे या वाक्यात ! आपल्या जीवनात कितीतरी घटना परत परत घडत असतात. पण आपण त्यातून काहीच बोध घेत नाही. तीच चूक वारंवार करत असतो. पण काही धडे असे असतात की, ते एकदाच अद्दल घडवतात. मग पुन्हा त्याची आठवण सुद्धा नको वाटते. तो धडा सोडून भराभर पुढे जावे वाटते. मधली पाने मग भराभर उलटली जातात. आपल्याकडून हे आपोआप घडते. कधी आपणच मधल्या पानांना टाळण्याचा प्रयत्न करतो. पुढचा धडा अधिक चांगला असेल, आपल्या आवडीचा असेल या वेड्या आशेने पाने उलटत जातो. मधल्या न आवडणाऱ्या धड्याचा अभ्यास आपण टाळू शकत नाही. तो वाचावाच लागतो आणि त्यावरच्या प्रश्नांना उत्तरे पण द्यावी लागतात; जशी आपल्याला येतील तशी, जरी ती चुकीची असली तरी. आपल्या आयुष्याचा तो एक अविभाज्य भाग असतो. त्यावरची उत्तरे देऊनच ते प्रश्न सोडवावे लागतात. खरं तर काही प्रश्नांची उत्तरे वेगळीच अपेक्षित असतात. कधी आपल्याला, कधी इतरांना. मग त्या वेगळ्या उत्तराचा आणखीन वेगळाच अर्थ उलगडत जातो. वेगळीच कलाटणी त्या प्रश्नाला दिली जाते आणि त्या उत्तरातून प्रश्नच निर्माण होतात. खूप प्रश्न की ज्यांची उत्तरे अपूर्णच असतात. अशा वेळी धडा नीट समजावून घेणे हेच महत्त्वाचे असते. उगीच घाईघाईने पाने उलटून खऱ्या प्रश्नांची खरी उत्तरे टाळण्यात काय अर्थ आहे ? म्हणून नीट समजेपर्यंत तीच तीच पाने परत परत वाचली पाहिजेत. पाने उलटण्याची घाई करू नये.

**- सौ.कुंदा गो.मुळे,** अ.नगर

दूरध्वनी - २४२३०७१

YYYYY

## H ५ नोव्हेंबर : 'रंगभूमीदिना'निमित्त

रंगभूमी म्हटले की नाटक आले आता तर नवनाट्य, लोकनाट्य, पथनाट्य इ. प्रकार पहावयास मिळतात. शासनाचे प्रोत्साहन असतेच पण पूर्वी लोकाश्रयावरच ज्यांनी नाटक कंपनी चालवली त्यात केशवराव भोसले हे अग्रणी. त्यांची नाट्य व्यवसायावर विलक्षण निष्ठा होती.

१९१४ च्या सुमाराला इन्फ्लुएंझाची साथ आली. कंपनीच्या अमरावतीच्या मुक्कामात कंपनीला चांगलाच आर्थिक फटका बसला होता पण तरीसुद्धा जिद्दीने मानापमानाचे प्रयोग चालू होतेच. एक दिवस मात्र कहरच झाला. प्रेक्षागृहात फक्त ७ प्रेक्षक. पण त्या दिवशी केशवराव इतके जबरदस्त गायले की पूर्वी असे गाणे झालेच नव्हते. कोणीतरी विचारले, ''केशवराव आज खरेतर नाटक रद्द करायचे. उलट तुम्ही तडफेने गायलात ते कशासाठी ? केशवराव म्हणाले, ''मला ठाऊक आहे. गावात साथ आहे तरीसुद्धा जिवावर एक प्रकारे उदार होऊन माझे गाणे ऐकण्यासाठी ही सात मंडळी तिकीट काढून आली. त्यांच्या या नाट्यप्रेमाचा उतराई कसा होऊ ? केवळ त्यांच्या समाधानासाठीच नव्हे तर माझ्या कलेशी इमान राखण्यासाठी मी गायलो. केशवरावांची कलेवरची ही अव्यभिचारी निष्ठा पाहून आपण आपोआपच नतमस्तक होतो.

**- श्रीधर सहस्रबुद्धे,** पुणे

## H ठेविले अनंते

ठेविले अनंते तैसेची राहिले
तेच जीवनी समाधान पावले ॥

नशिबी आले दुःख, तर सोशित राहिले
आले नशिबी सुख, तर सुखात पोहले ॥

ताटात आले अन्न कमी, उपाशी राहिले
भरपेट मिळाले तर, ढेकर देत बैसले ॥

थंडीत नाही पांघरुण, कुडकुडत जागले
मिळाली जर रजई, निवांत झोपले ।

चालताना वाटेत काटे कुणी पेरले
हसत हसत त्यांनी ते सल सोसले ॥

तेच पुरुष भाग्याचे, सदा आनंदी राहिले
'सुख-दुःखे समे कृत्वा' ज्यांनी जाणिले ॥

**- वसंत धुपकर,** पुणे

NNNNN

## ० सोनियाच्या ताटी...... करवंटी !

(भो तुकाराम...... क्षम्यताम्)

पापाची माणसा, नको खंत देवा ।
त्यासाठी निर्लज्ज ठेवा मज ।।१।।
शिव्या-शाप देण्या, इरसाल नामी ।
तोंडाचा वाचाळ बराच मी ।।२।।
चोरी-दरोड्याच्या, गोष्टी पडो कानी।
त्यासाठी लंबकर्ण बरा असे ।।३।।
बार-बाला माझ्या, असाव्या सांगाती ।
त्यांची क्रेझ काय सांगू तुला ।।४।।
परस्रीवरती, नित्य माझा डोळा
आठवे गोपाळा लीला तुझी ।।५।।
रम-रमा-रमी, त्रिसूत्री यशाची ।
पायरी सुखाची काळे धन ।।६।।
धाडीचे संकट, नका आणू देवा ।
लाचेचा तो मेवा अर्पीन मी ।।७।।
कली-युगी तुझ्या, जर जगणे सुखाचे ।
हेचि देई मला पसायदान ।।८।।

- **श्री.गोविंद शं.करमरकर,** सांगली

## Pony - tail

In a film - The make-up-man gives
Red-red lips
Telling an artificial tale.

In a business - One friend gives another
Bad-bad tips,
With a decrease in sale.

At Home - Mother gives
Good-good share of love
On an endless scale.

In fact - Its better to have manageable
Red-red rubber-band
On a grey pony-tail !

- **Kalpana Subhash Kothare,**
Santacruz

## ० पाऊस

या अलिकडच्या काळात पावसाचे..
वागणे झाले आहे माणसासारखे
बेशिस्त अन् बेभरवशी
केव्हाही येतो, कसाही येतो
कोठेही येतो वेड्यासारखा
पूर्वीसारखा पाऊस
राहिला नाही साधा गोजिरवाणा
तो झाला आहे खलनायक
आला तर येतो दणादणा
पूर्वसूरींच्या थोर थोर कवींनी
वर्णिलेला शहाणा, सज्जन पाऊस
बरसत नाही आता फारसा
वेधशाळेला चुकवत चुकवत
नुकसान करतोय जरासा
सर्वत्र पुराचे पाणीच पाणी
भरपूर जीवित वित्त हानी
पावसाच्या साथीने येतो
तो चक्रम बेभान वारा
करतो पडझडीचा हा पसारा
त्यामुळे पाऊस आता नकोसा होतो
फक्त गुलाबदाणीसारखा शिंपडून
शांतपणे, जावासा वाटतो



- **अरुण भट,** बदलापूर (पूर्व)

## तजवीज

राजेश आपल्या पत्नीला सांगत होता, 'हे बघ, मी एका तासात परत येण्याचा प्रयत्न करता नाहीच आलो तर संध्याकाळपर्यंत येईन आणि संध्याकाळपर्यंत नाही आलो तर समज की मला अचानक बाहेरगावी जावे लागले आहे आणि तसा मी बाहेरगावी गेलोच तर शिपायाबरोबर चिठ्ठी पाठवून देईन.'

'शिपायाला तसदी देण्याचं कारण नाही. मी तुमच्या खिशातून चिठ्ठी घेतली आहे' पत्नी म्हणाली.

- **पी. के. देवधर,** पुणे
भ्रमणध्वनी : ९३७१२२२८३५

## H ज्ञानेश्वरी- ९वा अध्यायसुबोध अनुवाद

भावार्थदीपिका म्हणजेच श्रीज्ञानेश्वरी हा सातशेहून अधिक वर्षांपूर्वीचा ग्रंथ. श्रीज्ञानेश्वर महाराजांचा हा ग्रंथ मराठी भाषेचे अपूर्व लेणे आहे. पिढ्यान् पिढ्या श्रद्धेने वाचला जाणारा हा ग्रंथ आजही विद्वानांना आव्हानात्मक वाटतो. पण सातशे वर्षांपूर्वीची मराठी भाषा, शिवाय ओवीबद्ध. परिणामी पहिल्या वाचनाचे वेळीच जर थोडी पेंग आली तर अस्वाभाविक नाही. पण नेट धरून वाचली तर त्यातला आनंद काही विरळाच. त्यातील केवळ अध्यात्मच नव्हे तर साहित्य सौंदर्यही तितकेच महत्त्वाचे. पण तत्कालीन मराठीचा बाऊ वाटणाऱ्यांची सोयही प्रा.अनंतराव आठवले, डॉ.श्री.भा.वर्णेकर इ.नी ज्ञानेश्वरी प्रचलित मराठीत ओवीबद्ध रचनेद्वारे केली आहे. तशीच आणखी एक स्वागतार्ह भर आपल्या संघटनेचे सभासद डॉ.सुहास सदानंद पेठे (सातारा) यांनी घातली आहे. अगदी लहान वयातच तत्त्वज्ञानाची पीएच्.डी.पदवी मिळवलेल्या डॉ.पेठेंनी नेमकी मोजून २५ वर्षे बँकेत नोकरी पूर्ण झाल्यावर स्वेच्छानिवृत्ती घेतली. आता ते ज्ञानेश्वरी चिंतनात काल व्यतित करत आहेत.

चिंतनातूनच ज्ञानेश्वरीच्या ९ व्या अध्यायाचा प्रचलित मराठीत सुबोध सुलभ अनुवाद करण्याची स्फूर्ति झाली. त्याचे दृश्यस्वरुप आता ग्रंथरुपाने आपणापुढे आहे. मूळ ओवीला आधुनिक मराठी ओवी आहे. मूळच्या शब्दकलेला धक्का न लावता केलेला हा अनुवाद समाधान देणारा तर आहेच, शिवाय अधिक म्हणजे पुढील मागील अध्यायांची प्रतीक्षा करावयास लावणारा आहे, असे असले तरी डॉ.पेठेंना वाटते की आपला अनुवाद वाचल्यावर वाचकांनी मूळ ज्ञानेश्वरीकडे वळावे, ती समजून घ्यावी.

डॉ.पेठेंचे या अनुवादाबद्दल अभिनंदन आणि पुढील अनुवादासाठी शुभेच्छा.

अनुवादासाठी डॉ.पेठे यांचेशीच संपर्क साधावा. फोन क्र. ०२१९२-२५२२६६

- **श्री.वि.सहस्रबुद्धे,** पुणे

## H प्रतिक्रिया

१) 'संवाद' मधील लेखांबरोबरच संपादकीय वाचताना आनंद आणि समाधान मिळते. माझे स्वत:चे वर्तमानपत्र असते तर आपणांस संपादक बनण्याविषयी जरूर विचारणा केली असती.

आजपर्यंतचे 'संवाद' चे अंक मी बाईंड करणार आहे. त्यामुळे सवडीनुसार मी ते वाचू शकेन आणि पुन:प्रत्ययाचा आनंद मला घेता येईल.

- **ए.के.कुलकर्णी,** अंधेरी (मुंबई)

H H H H H

२) ऑगस्ट २००८ चा अंक मिळाला. 'संपादकीय अत्यंत विचार करण्यासारखे आहे. उरलेल्या आयुष्यात सर्वांनीच नकारात्मक विचार सोडून सकारात्मक विचार केला तर नक्कीच आनंदी राहू. श्री.शरद शिंगवेकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा धावता वृत्तांत सर्व समावेशक असून काही कारणाने येऊ न शकलेल्या सभासदांना सभेचे संपूर्ण वृत्त समजण्यास निश्चितच मदत होईल. 'संवाद' ला माझ्या शुभेच्छा.

- **अनिल खाडिलकर,** पुणे

H H H H H

३) 'संवाद' मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखांविषयी संपादक मंडळ लेखकांशी सहमत असो वा नसो, मी मात्र संपादक मंडळाच्या मताविषयी सहमत आहे. 'संवाद' ऑगस्ट २००८ च्या अंकात संपादकीयमध्ये विषद केल्याप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांनी नकारात्मक विचारसरणी सोडून सकारात्मक विचारात स्वत:ला गुंतवावे व दु:ख बाळगण्याचे ओझे दूर ठेवावे.

- **विजयकुमार व्यं.देशपांडे,** सोलापूर

H H H H H

## एप्रिल फूल

''अहो मी गेले तर तुम्ही पुन्हा लग्न करू नका हं !'' मरणपंथाला लागलेल्या ठमाकाकू क्षीण आवाजात नवऱ्याला सांगत होत्या.

''काहीतरीच काय बोलत्येस अशावेळी ? लग्न कशाला करू पुन्हा वेडे ? तू बिलकूल काळजी करू नकोस. आपल्या नव्या स्वयंपाकीणबाई आहेत ना मला काय हवं नको ते बघायला !''

- **विवेक ठाकुर**, दादर (मुंबई)

## आता पुन्हा लग्न कशाला ?

''काय छान दिसतेस गं आज तू ! जगातील सर्वात सुंदर रमणीसुद्धा तुझ्यापुढे फिकी वाटेल. तुझा हा तेजाळ चंद्रासारखा चेहरा किती पाहिला तरी मन भरतच नाहीए......''


''अय्या खरंच ! थँक्यू.... थँक्यू हं !''

''झालीसच ना 'एप्रिल फूल' वेडे !''

- **विवेक ठाकुर**, दादर (मुंबई)
दूरध्वनी - (०२२) २४३००३२५

## 0 माझे जीवन गाणे

व्ही.आर.एस.ची लाटच आली
आणि धनाची चंगळ झाली
वर्षामागुनी वर्षे गेली
अखेर थैली रिक्त जाहली ।।१।।
आहे अजुनही प्रेम दिवाना
विना शिकारी घायल ससाणा
मोतिबिंदू नजरेतून हटेना
प्रिय प्रेयसी नयनी दिसेना ।।२।।
नको कंगवा टक्कल पडले
असे नळी तरी दातच गेले
चालू कसा मी सांधे धरले
जगण्याचे तर वांधे झाले ।।३।।
नेतेगिरीचा होता काळ
सुटतच नाही अजुनही पीळ
तुटतच नाही त्याची नाळ
जणू-आजही माझ्या गळ्यात माळ ।।४।।
अधिकाराचा गर्व कशाला ?
का तो भासे स्वर्ग मजला ?
काळ सुगीचा कधीच संपला
सत्य कळण्या उशीर जाहला ।।५।।
कां गातो मी बेसुर गाणे
मज ठावे ना ते रडगाणे
असेच असते अधिक न् उणे
गातो माझे जीवन गाणे ।।६।।



**- प्रभाकर कानिटकर, कोल्हापूर**

## निवेदन

डोंबिवली ते बदलापूर या विभागात राहणाऱ्या पेन्शनरांची सभा शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर २००८ रोजी दुपारी ४.३० वाजता डोंबिवली (पूर्व) शाखेत आयोजित केली आहे. सभेत फेडरेशन व सर्कलचे अध्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत. तरी सर्व पेन्शनरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ही विनंती.

- सुभाष आगरकर, कमिटी मेंबर (मुंबई)


# शेअर्सवर कमवा

सुनिधी

**सुनिधी सिक्युरिटीज् अॅन्ड फायनान्स**

(कर्वेरोड शाखा)

(चॅनेल पार्टनर : एम.डी.ब्रह्मक्षत्रीय)

- ✻ शेअर्स खरेदी विक्री
- ✻ डे ट्रेडींग
- ✻ डिमॅट सुविधा
- ✻ म्युच्युअलफंड इन्व्हेस्टमेंटस्
- ✻ डे ट्रेडींगसाठी योग्य मार्गदर्शन (टिपस्)
- ✻ स्टेट बँक पेन्शनर्ससाठी ब्रोकरेजमध्ये विशेष सूट

208, _hmS H$a M~g, (~mQm {~pëS J)
X gam _Ob m, H$arî_m MmH$, H$d aMS, H$mWêS ,
nU 411038: \$mZ - 25435423


## काय प्रश्न ?

आगगाडी एकदम थांबली म्हणून सगळेजण बाहेर डोकावून पाहू लागले.

'काय झालं हो ?' एका बाईने विचारले.

'काही नाही. गाडीनं एका बैलाला धडक दिली.'

'ट्रॅकवर होता का तो बैल ?'

'नाही. गाडीनं कडेला जाऊन त्याचा पाठलाग केला.'

**- पी. के. देवधर,** पुणे

## बिकट अवस्था

घटस्फोटासाठी कोर्टात आपली बाजू मांडताना तनुजा म्हणाली, 'न्यायाधीश महाराज, मला सात मुलं झाली. परंतु आश्चर्याची बाब म्हणजे माझ्या पतीचं माझ्यावर काडीमात्र प्रेम नाही.

'नशिब तुमचं ! ते प्रेम जर असतं तर तुमची अवस्था याहून बिकट झाली असती ! न्यायाधीश म्हणाले.

**- पी. के. देवधर,** पुणे

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
License to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

## 'Dharna' on 23rd September 2008 at Azad Maidan, Mumbai - Snap Shots



Shri. B. G. Dandekar, Federation President, speaking at Dharna.
On the dais ( L to R) V. M. Gokhale, R. Nagrajan, P. P. S. Murthy, H. C. Rindani & Shantha Raju



A large gathering of Pensioners who participated in 'Dharna' exhibiting their solidarity & faith in Federation leadership

---

सूचना : १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

**If Undelivered Please Return to :**
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030. Phone : 24332141**

To,
__________

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.